रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९| अंक २३८ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी २०२६ किंमत ४ ₹

**प्रत्येक लढ्यात खारेपाट शेकाप सोबत**

मागील दहा दिवसांत रायगड जिल्हा आणि अलिबाग तालुक्यात व्यापक जनसंपर्क साधल्याचे सांगत जयंत पाटील म्हणाले की, सांबरी टोकापासून ते नवगावच्या टोकापर्यंत फिरून मतदारांच्या समस्या जाणून घेतल्या. खारेपाटाने स्वातंत्र्यपूर्व काळात उभारलेला लढा आणि स्व. नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांसाठी झालेल्या कूळ कायद्याच्या चळवळीचा त्यांनी विशेष उल्लेख केला. 'कसेल त्याची जमीन' हा कायदा अंमलात आणण्यासाठी सरकारला भाग पाडणाऱ्या लढ्यात खारेपाटातील अनेक घराण्यांचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी नमूद केले.



# खारेपाटात कमळ फुलणार नाही

**जयंत पाटील यांचा सूचक टोला**

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

**खारेपाट परिसरात असलेल्या असंख्य तलावांवर आणि तळ्यांमुळे हजारो कुटुंबांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे. याशिवाय याच तलावांवर रोजगारही अवलंबून आहे. या तलावांतील पाणी इतके शुद्ध आहे की, या तलावांमध्ये कधीही कमळ फुलले नाही आणि भविष्यातही फुलणार नाही, असा सूचक टोला शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी नाव न घेता लगावला. खारेपाटात आजवर अनेक संघर्ष झाले असून, ही केवळ निवडणूक नसून, अस्तित्वाची लढाई आहे. खारेपाटातील जनता कधीही कमळ फुलू देणार नाही. येथील पाणी आणि माती दोन्हीही जनतेच्या विरोधात काम करणाऱ्यांना साथ देणार नाही, असा ठाम विश्वास व्यक्त करत जयंत पाटील यांनी या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षासह महाविकास आघाडीच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले.** (संबंधित वृत्त/छायाचित्र पान ३ वर.) पान ५ वर



## खारेपाटात 'कॉर्पोरेट खोत' फिरताहेत

### शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील कडाडल्या

खारेपाटामध्ये नव्या स्वरूपातील 'कॉर्पोरेट खोत' फिरू लागले असून, जमीन, अस्तित्व आणि स्थानिक हक्कांवर डोळा ठेवणाऱ्या शक्तींना रोखण्यासाठी शेतकरी कामगार पक्ष, काँग्रेस आणि महाविकास आघाडीच निर्णायक ठरणार आहे, असा घणाघात शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केला. कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलताना त्यांनी विरोधकांचा चांगलाच समाचार घेतला. रायगडचे भाग्यविधाते स्व. नारायण नागू पाटील, स्व. प्रभाकर पाटील आणि स्व. ॲड. दत्ता पाटील, स्व. मीनाक्षी पाटील यांच्या कार्याची आठवण करून देत त्यांच्या कार्याला उजाळा दिला. त्या पुढे म्हणाल्या की, मी जेव्हा आमदारकीला उभी राहिले, तेव्हा खारेपाटात माझा तितका संपर्क

नव्हता. पण इथल्या कार्यकर्त्यांची जिद्द, संघर्षाची ताकद आणि घराघरात पोहोचण्याची तळमळ मला नेहमी प्रेरणा देत आली. ज्येष्ठ कार्यकर्ते अमरनाथ गुरुजी यांच्या कामाचे त्यांनी विशेष कौतुक केले.

यावेळी त्यांनी कोणाचेही नाव न घेता घर, कुटुंब आणि पक्ष सोडून गेलेल्यांवर जोरदार हल्लाबोल केला. त्या म्हणाल्या की, जेव्हा घरावर भाजपाचा झेंडा लागला, तेव्हा भाईंना खोत परत आल्यासारखे वाटले. त्यांना याचे अतीव दुःख झाले होते. परंतु, या दुःखातून सावरण्याचे काम येथील कार्यकर्त्यांनी दूर केल्यामुळेच ते पुन्हा नव्या उमेदीने उभे राहिल्याचे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना धन्यवाद दिले. त्याप्रमाणे आंबेपूर मतदारसंघातील जिल्हा परिषद उमेदवार पूजाचा विजय हेच त्या दुःखावरचे औषध ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.स्व. नारायण नागू पाटील यांनी ज्या भूमीत खोतीविरोधात लढा दिला, तिथे आज नव्या पद्धतीचे कॉर्पोरेट खोत फिरत आहेत, असा टोला लगावत त्यांनी जमीन आणि हक्क वाचवण्यासाठी शेकापची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. रस्ते, मुलींना सायकल वाटप, पोयनाड बाजारपेठेतील रस्ता यांसारखी कामे शेकापमुळेच शक्य झाल्याचे त्या म्हणाल्या. आपला पक्ष डाव्या विचारांचा आहे. घरातील उमेदवार न पान ५ वर





## खारेपाटातून स्फूर्ती मिळते

पोयनाडमध्ये अनेक वर्षांनंतर कार्यकर्त्यांच्या प्रचंड उपस्थितीत झालेल्या भव्य सभेत शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी खारेपाटाशी असलेले आपले भावनिक नाते अधोरेखित करत कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. माझा खारेपाट मला स्फूर्ती देतो; इथूनच महाराष्ट्रभर काम करण्याची उर्जा मिळाली, असे सांगत त्यांनी खारेपाटाच्या ऐतिहासिक वारशाची आठवण करून दिली.

## लाल बावटा अभिमानाचा

ज्या खारेपाटाच्या जीवावर जिल्ह्यावर राज्य केलं, विधीमंडळात प्रभावी आमदार पाठवले, आज त्या खारेपाटात पुन्हा एकदा शेकापचा लाल बावटा फडकवायचा आहे. अलिबागच्या भूमीने शेकापचे असो वा दुसऱ्या पक्षाचे आजपर्यंत निष्ठावंत, भ्रष्टाचारात न अडकलेले आमदार निवडून दिले आहेत. मात्र आता टक्केवारीचे राजकारण सुरु आहे. कोणीही कितीही पक्ष बदलले तरी तुम्ही पाठीशी ठामपणे उभे आहात म्हणून कसलीही भिती नाही. जनतेमध्ये चीड, द्वेष आहे, त्यामुळे बदला घ्यायचा आहे. पक्ष बदलून काही लोक गेले, मात्र आजही खारेपाटातील निष्ठावंत जनता लालबावट्यासोबत आहे. आणि म्हणूनच शेकापचा लालबावटा अभिमानाने फडकत आहे.

## खारेपाटचा बालेकिल्ला शाबूत ठेवा : गौतम पाटील

आंबेपूर मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाची ताकद अजूनही तितकीच भक्कम असून, खारेपाटचा बालेकिल्ला कोणाच्याही अपप्रचाराने डळमळीत होणार नाही, असा ठाम विश्वास शेकापचे जिल्हा सहचिटणीस गौतम पाटील यांनी व्यक्त केला. कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने पक्षाचा मतदार आजही लाल बावटा हातात घेऊन पक्षाच्या मागे ठामपणे उभा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

भाई जयंत पाटील यांच्या सुपीक डोक्यातून या मतदारसंघात एक सर्वसामान्य वकील मुलगी उमेदवार म्हणून दिली गेली, हे पक्षाच्या विचारांचे उदाहरण असल्याचे सांगत पाटील म्हणाले, हा मतदारसंघ कोणाची खासगी मक्तेदारी नाही. हा मतदारसंघ शेतकरी कामगार पक्षाचा होता, आहे आणि कायम राहील.

ते पुढे म्हणाले की, भाई, तुमच्या महालाची एकही वीट हललेली नाही. भिंती अजूनही मजबूत आहेत. कितीही अपप्रचार झाला तरी पक्षाचा मतदार विचलित झालेला नाही, हे आज उपस्थित असलेल्या निष्ठावान कार्यकर्त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे, असे त्यांनी सांगितले. सात तारखेला मतपेटीत ही ताकद दिसून येईल आणि आंबेपूर मतदारसंघातील दोन्ही उमेदवार विजयी होतील, पान ५ वर




## वेधक

### 'फडणवीसांना बोलण्याचा अधिकार नाही'

**मुंबई :** राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर फडणवीसांना बोलण्याचा अधिकार नाही, असे विधान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले. तसेच अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यात विलीनीकरणाबाबत चर्चा सुरू होती, असेही शरद पवार म्हणाले. राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत अजित पवार यांनी आपल्याला सांगितलं असतं, असे विधान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. यावर उत्तर देताना शरद पवार म्हणाले की, या संपूर्ण चर्चेत फडणवीस कुठेही नव्हते.

### कमळाकर साखळे यांचे निधन



**रेवदंडा:** शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठवान कार्यकर्ते, रेवदंडा ग्रामपंचायतीचे माजी सदस्य, सुमित्र पतपेढीचे चेअरमन कमळाकर साखळे (आप्पा) यांचे अल्पशा आजाराने बुधवार, दि. ४ फेब्रुवारी रोजी राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच विविध क्षेत्रातील मंडळींनी त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेत, श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या पार्थिवावर रेवदंडा येथील स्मशानभूमीत रात्रीच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

## तब्बल २४ तास महामार्ग ठप्प

**खोपोलीजवळ भीषण कोंडी; अडकलेल्या प्रवाशांकडून टोलवसुलीवर संता**

| खोपोली | प्रतिनिधी |

मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग आणि जुन्या मुंबईपुणे महामार्गावर खोपोली ते लोणावळा घाटदरम्यान गेल्या २४ तासांपासून भीषण वाहतूक कोंडी निर्माण झाली असून, हजारो वाहनचालक अक्षरशः रस्त्यावर अडकून पडले आहेत. मंगळवारी सायंकाळी आडोशी बोगद्याजवळ केमिकल वाहून नेणारा टँकर पलटी झाल्यानंतर ही कोंडी सुरू झाली. मात्र, इतका वेळ उलटूनही वाहतूक सुरळीत करण्यात प्रशासनाला अपयश आले आहे. या परिस्थितीतही खालापूर व खोपोली टोल नाक्यांवर टोलवसुली सुरूच असल्याने प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



खालापूर टोल नाक्यापासूनच पुण्याच्या दिशेने वाहतूक संथ झाली असून, खोपोली ते लोणावळा घाट सड्यापर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. जुन्या महामार्गावर वळवलेल्या वाहनांमुळे तिथेही कोंडी वाढली आहे. विशेष म्हणजे, वाहतूक कोंडीबाबत कोणतीही पूर्वसूचना, संदेश किंवा पर्यायी मार्गांची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली नाही. त्यामुळे अनेक प्रवासी तासन्तास वाहनांत अडकून पडले. या कोंडीत महिलांपासून पान ५ वर

## रायगडमध्ये दहावी–बारावीच्या परीक्षांसाठी कडक निर्बंध

**परीक्षा केंद्रांभोवती ५० मीटर परिसर सीलबंद**

| अलिबाग | प्रतिनिधी |

फेब्रुवारी–मार्च २०२६ या कालावधीत होणाऱ्या इयत्ता बारावी व दहावीच्या सार्वजनिक परीक्षा गैरप्रकारमुक्त, पारदर्शक आणि शांततेत पार पडाव्यात यासाठी रायगड जिल्ह्यात जिल्हा दंडाधिकारी किशन जावळे यांनी मनाई आदेश जारी केला आहे. हा आदेश नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्र वगळून जिल्ह्यातील सर्व परीक्षा वितरण केंद्रे आणि परीक्षा केंद्रांवर लागू राहणार आहे.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) परीक्षा दि. १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत, तर माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षा दि. २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत होणार आहेत. या कालावधीत संबंधित सर्व परीक्षा केंद्रांवर कडक निर्बंध लागू असतील. मनाई आदेशानुसार परीक्षा केंद्राच्या ५० मीटर परिसरात मोबाईल फोन व पेजर वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच एस.टी.डी. बूथ, झेरॉक्स मशिन आणि फॅक्स मशीन चालू ठेवण्यास मनाई करण्यात आली आहे. प्रत्येक पेपरच्या २४ तास आधीपासून परीक्षा केंद्रांच्या ५० मीटर परिसरातील झेरॉक्स दुकाने बंद ठेवण्याचे आदेश पान ५ वर

PRAKRUTI™ RESORTS PVT. LTD.

**जॉब व्हॅकेन्सी**

**प्रकृती रिसॉर्ट्स प्रा. लि. (४ स्टार रिसॉर्ट)**

१) रिसेपशनिस्ट– फ्रंट ऑफीस
२) साऊथ इंडियन शेफ– एफ अँड बी प्रोडक्शन
३) पब्लिक रिलेशन मॅनेजर

**पगार– इंडस्ट्री स्टॅंडर्डनुसार**

**संपर्क :** ७३५०३२९८६९/८६९८३२८१४०
मुलाखत वेळ : सकाळी ११.०० ते दुपारी ०४.००
जेवणाची व राहण्याची व्यवस्था रिसॉर्टकडून केली जाईल.

**पत्ता : मु. पो. काशिद, ता. मुरुड, जि. रायगड-महाराष्ट्र ४०२ ४०१**

**मतदानाच्या पार्श्वभूमीवर निर्णय** **६, ७ आणि ९ फेब्रुवारीला मद्यविक्री बंद**

## रायगडमध्ये तीन दिवस 'ड्राय डे'

| अलिबाग | प्रतिनिधी |

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका शांततेत, मुक्त व निर्भय वातावरणात पार पडाव्यात आणि जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी रायगड जिल्ह्यात संबंधित निवडणूक क्षेत्रांमध्ये सलग तीन दिवस 'ड्राय डे' जाहीर करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी किशोर जावळे यांनी आदेश जारी करत ६ फेब्रुवारी (मतदानाच्या आदल्या दिवशी), ७ फेब्रुवारी (मतदानाचा दिवस) आणि ९ फेब्रुवारी (मतमोजणीचा दिवस) या दिवशी मद्यविक्री पूर्णतः बंद ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. ६ व ७

**कारवाईचा इशारा**

रायगड जिल्ह्यात निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दि. ६, ७ आणि ९ फेब्रुवारी रोजी सर्व प्रकारची मद्यविक्री बंद ठेवण्याचा आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिला आहे. दरम्यान, या नियमाचा भंग केल्यास कठोर कारवाईचा इशारा जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. संबंधित परवानाधारकांनी आदेशाचे पालन करावे, असा इशारा देण्यात आला आहे.




फेब्रुवारी रोजी संपूर्ण दिवस मद्यविक्री बंद राहील, तर ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी पूर्ण होऊन निकाल जाहीर होईपर्यंत विक्री बंद राहणार आहे.

७ फेब्रुवारी रोजी रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ आणि पंचायत समितीच्या ११८ गणांसाठी मतदान होणार असून, ९ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे. मुंबई मद्य निषेध अधिनियम, १९४९ च्या कलम १४२ (१) तसेच लोकप्रतिनिधित्व अधिनियमातील कलम १३५ (सी) नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून हा आदेश देण्यात आला आहे. या आदेशानुसार संबंधित निवडणूक क्षेत्रांतील तसेच मतमोजणी केंद्रांच्या कार्यक्षेत्रातील सर्व ठोक व किरकोळ मद्यविक्री आणि माडी विक्री अनुज्ञप्त्या (एफएल–१, एफएल–२, एफएल–३, एफएल–४, एफएल/बीआर–२, सीएल–२, सीएल–३, टिडी–१ आदी) या तीन दिवसांसाठी बंद राहतील.

या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले असून, उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ च्या कलम ५४ व ५६ नुसार परवाना कायमस्वरूपी रद्द करण्याची कारवाई होऊ शकते, असा इशाराही जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

**एस आर कॉम्प्लेक्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
धरमतर रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड –४०२ १०७

नोंदणी क्र.(आर.जी.डी./पी.ई.एन.–ए एच–ए–एस.जी– (टीसी) २६४६/ सन २०१३ दि. १४/०८/२०१३
जा क्र : २०२६/०२/०१

**पुनर्विकासासाठी निविदा सादर करणेबाबत**

संस्थेचे नाव : एस आर कॉम्प्लेक्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. पेण–धरमतर रोड, रायगड बाजार समोर, पेण
सर्व्हे नं. १२३/ब/५/१ए १२३/ब/५/२, १२३/ब/५/३
क्षेत्रफळ : २१५०Sq.m
एकूण ग्राऊंड+२ मजले (३८ व्यापारी गाळे)
संस्थेच्या बांधकामाला २० वर्षे झाली असून, बांधकाम दर्जा निकृष्ट असल्याने इमारत पुनर्विकास करणेस निविदा मागविण्यात येत आहेत.

१. कोऱ्या निविदा जाहिरात दिल्यापासून २० दिवसात संस्थेकडून नेण्यात याव्यात.
२. भरलेल्या निविदा रक्कम रु. ५०००/– डिमांड ड्राफ्टद्वारे संस्थेच्या नावे काढण्यात यावी.
३. भरलेल्या निविदा संस्थेच्या अध्यक्षांकडे दि. २२/०२/२०२६ पर्यंत देण्यात यावी.
४. अधिक माहितीकरीता संस्थेचे अध्यक्ष श्री. अजित पोवळे यांच्याशी संपर्क साधावा. नं. ९२७०३७०८७६

Mail id. gajananele21@gmail.com

सही
अध्यक्ष

# रायगडात मतदानाआधी कडक मनाई

## जिल्हा दंडाधिकाऱ्यांचा आदेश लागू

| अलिबाग | प्रतिनिधी |

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक शांततेत, मुक्त आणि निष्पक्ष वातावरणात पार पडावी यासाठी रायगड जिल्ह्यात मतदानापूर्वी २४ तास कडक मनाई आदेश लागू करण्यात आला आहे. जिल्हा दंडाधिकारी किशन जावळे यांनी हा आदेश जारी केला आहे. ७ फेब्रुवारीला मतदान आणि ९ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे. या आदेशानुसार ५ फेब्रुवारी रात्री १२ वाजल्यापासून ७ फेब्रुवारी सायंकाळी ७ वाजेपर्यंत संबंधित मतदारसंघात पाचपेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र जमण्यास मनाई राहील. सार्वजनिक सभा, बैठका, निवडणूक प्रचार, बल्क मेसेजिंग, लाऊडस्पीकरचा वापर यावरही बंदी घालण्यात आली आहे.

मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मोबाईल, वायरलेस किंवा अन्य संपर्क साधने नेण्यास मनाई असेल. तसेच या परिसरात शस्त्र, वाहन, लाऊडस्पीकर, गोंधळ, आरडाओरड, प्रचार बुथ उभारणे किंवा कोणतेही आस्थापन सुरू ठेवणे प्रतिबंधित असेल. अपवाद म्हणून निवडणूक व सुरक्षा यंत्रणेतील अधिकारी-कर्मचारी, तसेच अपंग/वृद्ध/आजारी मतदारांना आणणारी वाहने यांना सवलत देण्यात आली आहे. राजकीय पक्षांचे बाहेरील कार्यकर्ते किंवा मतदार नसलेले नेते यांना संबंधित मतदारसंघात थांबण्यासही मनाई करण्यात आली आहे. मतदान केंद्राच्या परिसरात मतदारांवर प्रभाव टाकणारे कोणतेही कृत्य करू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

मतदान केंद्राच्या १०० मीटर बाहेर बुथ लावताना स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना पूर्वकल्पना देणे बंधनकारक राहील. प्रत्येक बुथवर केवळ एक टेबल व दोन खुर्च्यांचीच परवानगी असेल.

या मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २२३ नुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

### सात फेब्रुवारीला आठवडा बाजार बंद

मतदानाच्या दिवशी जिल्ह्यात ज्या ठिकाणी आठवडा बाजार भरतो, ते सर्व बाजार पूर्णवेळ बंद ठेवण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी जारी केले आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीत, निर्भय व गर्दीविरहित पार पडावी, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. आदेशाचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## सुरेश गरड श्रीवर्धनचे नवे पोलीस निरीक्षक

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन येथील पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांची बदली झाल्यानंतर त्यांच्या जागी सुरेश गरड यांनी ९ जानेवारी रोजी पोलीस निरीक्षक म्हणून कार्यभार स्वीकारला आहे. अलिबाग येथील पोलीस अधीक्षक कार्यालयातून त्यांची बदली श्रीवर्धन येथे करण्यात आली. श्री. गरड यांचे मूळ गाव धाराशिव जिल्ह्यातील खेड आहे. श्रीवर्धन येथे रुजू होण्यापूर्वी त्यांनी रायगडमधील कर्जत, अलिबाग, रायगड क्राईम ब्रँच तसेच गडचिरोली आणि पालघर जिल्ह्यात विविध पदांवर सेवा बजावली आहे.

# साईनाथ सेवा मंडळाच्या दिंडीचे शिर्डीकडे प्रयाण



| गडब | प्रतिनिधी |

साईनाथ सेवा मंडळ गडब यांच्यातर्फे प्रतिवर्षी पायी साई दिंडी पालखीचे गडब ते शिर्डी आयोजन करण्यात येत असून, या पालखीचे शिर्डीकडे प्रयाण झाले. सात दिवस या दिंडीचा प्रवास असून, या दिंडीमधून सामाजिक ऐक्य, स्वच्छता, व्यसनमुक्ती, स्वावलंबन हा संदेश देण्यात येत आहे. या दिंडी कालावधीत अनेक धार्मिक व समाज प्रबोधनाच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जात असल्याचे साईनाथ सेवा मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र कडू यांनी सांगितले.

### जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत कायमस्वरूपी सदर मिळकतींचे मालक यांचेकडून विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

**मौजे वैजनाथ ता. कर्जत जि. रायगड येथील खाली नमूद मिळकत**

| मालकाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| विक्रांत विरेन्द्रकुमार अग्रवाल | ७/३ | ०.३७.५० | ०.७० |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व ईतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांकः ०५/०२/२०२६

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत जि. रायगड
मो. नं. ९०४९४८६८०५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक सदाशिव पांडुरंग माळी यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक हे.आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ३०/४/अ | ००-१८-८० | १.१९ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक- ५ फेब्रुवारी २०२६

**ॲड. शरद आर. सावंत**
बी. कॉम. एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग, विहंग को. ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक प्रिया अंकुश बदे आणि सुषमा किशोर बागडे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक हे.आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ३०/२ | ००-२६-०० | ०.३० |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक- ५ फेब्रुवारी २०२६

**ॲड. शरद आर. सावंत**
बी. कॉम. एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग, विहंग को. ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे मांगरुळ, ता. पेण जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल अनिल जनार्दन ठाकुर, गजानन जनार्दन ठाकुर व कामिनी नरेंद्र ठाकुर त्याचे नमुद विद्यमान मालक श्री. शशिकांत सुदाम मानकवळे व इतर यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| मांगरुळ | १८५ | ०.७१.००<br>पो.ख. ०.३२.००<br>एकुण क्षेत्र १.०३.०० | १६.८६ |

वरील संपुर्ण क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण:- पेण
दि. ०४/०२/२०२६

**ॲड. हेमा.ज.पाटील (घोडिंदे)**
पेण पोलिस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोट आळी पेण मो.नं. ९८२२०३०३८९

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - पोटल, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.- आर. पॉ. | रुपये | पैसे |
| अभिजीत परशुराम म्हात्रे<br>गुलशन अशोक म्हात्रे | १३ | १/ब | ०-४८-८० | २ | ५९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- ०१/०२/२०२६

कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

### हरकत नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. नरेंद्र रघुनाथ भोईर, मु.पो. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या वारसा हक्काच्या व खुद्द मालकीच्या व ताबेकब्जा वहिवाटीची खालील वर्णनाच्या शेतजमीन मिळकती असून सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | जुना गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| झिराड ता. अलिबाग | ९४ | - | १-३३-०० | १.९० |
| | ९५ | - | ००-७१-३० | ७.५५ |
| | ९७/१ | ९८ | १-३८-८० | ५.९० |
| | ९८ | ९९ | ००-०४-५० | ०.४५ |
| | ९९ | १०० | ०-७५-४० | ८.६५ |
| | १०० | १०१ | ०-०४-०० | ०.०५ |
| | १०१ | १०२ | ०-३०-४० | ४.५० |
| | १०७ | १०८ | ०-६६-४० | ६.३५ |
| | ११२ | ११३ | ०-४६-०० | १.०५ |

सदर वर वर्णनांकित मिळकती आमचे अशिल श्री. नरेंद्र रघुनाथ भोईर, यांचे वारसा हक्काच्या तसेच मालकी व ताबेकब्जा वहिवाटीची असून सदर वर नमूद मिळकती आमच्या अशिलांचा ताबेकब्जा व वहिवाट हक्क व मालकी असताना आमच्या अशिलांचा हक्क डावलून परस्पर त्रयस्थ इसमांना विक्री करणार असल्याचे व त्याबाबतचा विक्रीचा करारनामा करणार असल्याचे आमच्या अशिलांच्या निदर्शनास आले आहे. सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतींबाबत कोणताही कसल्याही प्रकारचा व्यवहार करू नये. त्यास आमचे अशिलांची सक्त कायदेशीर हरकत राहील. याउपरही सदर मिळकतींबाबत कोणत्याही प्रकारचे खरेदीखत, बक्षिसपत्र, साठेकरार, वचनचिठ्ठी, सामंजस्य करार केल्यास त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत असून असा कोणताही व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०५/०२/२०२६

सही/-
**ॲड. विक्रांत वि. पाटील**
म्हात्रोळी, अलिबाग-रायगड
मो.नं. ८३२९४६१५४०/९४०३६५१४३६

### जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फ सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे:-

मौजे-गाण तर्फ परहूर, ता. अलिबाग, जि. रायगड हद्दीतील खालील वर्णनाच्या मिळकती.

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| गांण तर्फ परहूर | ६/१ | ०.०६.०० | ०.०८ |
| गांण तर्फ परहूर | ७/१ | ०.३०.२० | ४.६२ |
| गांण तर्फ परहूर | ७/२ | ०.३३.४० | ५.२६ |
| गांण तर्फ परहूर | ८/१ | ०.०६.०० | ०.१२ |

येणे प्रमाणे वर्णनाच्या मिळकती व त्यात असलेला झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, कुंपण, वगैरे सह अशा मिळकती बाबत सदरहू मिळकतीचे विदयमान मालक श्री. सुरेश बाबुराव केने व सौ. सुरेखा सुरेश केने, रा. बी- ४०८, प्रोग्रेसीव सी लॉन्ज, प्लॉट नं. ४४, ४५, सेक्टर १५, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांनी माझे आशील यांस संदर्भित मिळकती त्यांचे मालकी हक्काची व निर्वेध असल्याचा भरवसा दिला असून मिळकतीच्या मालकी हक्काची तपासणी करण्यास संमत्ती दिली आहे. याउपरही सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षीस, साठेकरार, दान, फरोक्त, कब्जा, वहीवाटीचे हक्क, लिन, कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, नोटरी सत्यप्रती व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिध्द झाल्या पासून १४ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन आमचे आशील व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख ०४.०२.२०२६

**(ॲड. एस.वाय.बारटके)**
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड

### दि नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

**वसुली कार्यालयः** प्लॉट क्र. ८-सी, सेक्टर-१३, १ला मजला, खांदा कॉलनी, न्यू पनवेल (पश्चिम), ४१०२०६. **नोंद./प्रशासकीय कार्यालयः** २१४, रहेजा सेंटर, फ्री प्रेस जर्नल रोड, नरिमन पॉईंट, मुंबई-२१. **दूरध्वनी क्र.** (०२२) २७४५८८६२८ **ईमेल पत्ताः** recovery@ncbmumbai.com

**ताबा सह विक्री सूचना**
**(नियम ८ (१) अन्वये)**
**(स्थावर मालमत्तेकरिता)**

ज्याअर्थी,

निम्नस्वाक्षरीकार यांनी **दि नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँक लि.**चे अधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ (सदर कायदा) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ च्या नियमन ९ सह वाचावयाच्या कलम १३(१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून मागणी सूचना संदर्भ क्र. एनसीबी/एचओ/आरईसी/१५२/२०२५-२६ दिनांक २७.११.२०२५ पारित करून, मालमत्तेचे मालक आणि कर्जदार **मे. श्री सिद्धेश्वर कार्गो मूव्हर्स (प्रोप्रा. श्री. ज्ञानेश्वर चंद्रभान चिकणे) आणि जामीनदार (१) श्री. चंद्रभान गणपत चिकणे, (२) श्री. बाळासाहेब तुकाराम दाते, आणि (३) श्री. अजिंक्य दत्तात्रय डुंबरे** यांच्याकडून सदर कायद्यानुसार सूचनेमध्ये उल्लेखिलेली रक्कम **रु. १०,६४,२३८.१५ (रुपये दहा लाख चौसष्ट हजार दोनशे अडतीस व पैसे पंधरा मात्र)** सदर सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांमध्ये परतावा करण्याची मागणी केली होती.

कर्जदार रकमेचा परतावा करण्यास अयशस्वी ठरल्याने, याद्वारे त्याला/तिला/त्यांना आणि सर्वसाधारण जनतेस सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार यांनी याखाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सदर नियमनांच्या नियमन ९ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३(४) अन्वये त्याला प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक **४ फेब्रुवारी, २०२६** रोजी सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार/जामीनदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे खबरदार करण्यात येते की, मालमत्तेसह कोणताही व्यवहार करु नये आणि मालमत्तेसह केलेला कोणताही व्यवहार **दि नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँक लि.**च्या **दि. ३१.०१.२०२६** रोजी नुसार रक्कम **रु. ११,२०,४९९.१५ (रुपये अकरा लाख वीस हजार चारशे नव्याण्णव व पैसे पंधरा मात्र)** आणि **दि. ०१.०२.२०२६** पासून त्यावरील पुढील व्याज आणि खर्च करिता प्रभाराच्या अधीन असेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

दुकान क्र. १, हावरे पारिजात सीएचएस, फेज-II, हावरे ग्रीन पार्क, सेक्टर-२२, प्लॉट क्र. १५, कामोठे - ४१०२०९. मोजमाप १९५ चौ.फू. बिल्ट अप.

तारणः बुक डेब्ट्स, सर्व विद्यमान मालमत्ता आणि गैर-विद्यमान मालमत्ता (विद्यमान आणि भविष्यातील)चे हायपोथिकेशन.

**३० दिवसांची वैधानिक सूचना**

उपरोल्लेखित कर्जदार आणि जामीनदार यांना **रु. ११,२०,४९९.१५ (रुपये अकरा लाख वीस हजार चारशे नव्याण्णव व पैसे पंधरा मात्र)** आणि व्याज आणि प्रभार या रकमेचा परतावा करण्याकरिता याद्वारे ३० दिवसांची सूचना देण्यात येते, अन्यथा गहाण मालमत्ता सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या समाप्तीनंतर सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२च्या नियम ८(५) (डी) आणि ९ अन्वये तरतुदींनुसार विक्री करण्यात येईल.

दिनांकः ०४.०२.२०२६
ठिकाणः पनवेल

सही/-
(श्री. आकाश घोलप)
अधिकृत अधिकारी,
दि नॅशनल को-ऑप. बँक लि., मुंबई करिता

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थानी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही,याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : अंजप ता: कर्जत जि:रायगड येथिल जमिन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रूपये | पैसे |
| १. हिराबाई सरजू दुबे<br>२. कुणाल बाळकृष्ण दुबे<br>३. धिरज बाळकृष्ण दुब<br>४. सौरभ बाळकृष्ण दुबे<br>५. शोभा बाळकृष्ण दुबे<br>६. प्रियांका बाळकृष्ण दुबे | २१ | १ | ०-४५-०० | ० | ३५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**कार्यालयीन पत्ता :-**
रिबेल्स एम्पायर,फ्लॅट नं २०२/२०३
आनंदी हाईटस, बाळासाहेब भवनाच्या वर,
अमराई रोड, कर्जत, ता : कर्जत
जि:रायगड ४१०२०१

**ॲड. महेश कमलाकर थोरवे**
दिनांक : ०५/०२/२०२६
मो. नं ८००७५३७६५६
ई मेल: advmthorve@gmail.com

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक दिपक रावजी लेकुरवाळा यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक हे.आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १८/५ | ००-०७-६० | ०.४४ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक- ५ फेब्रुवारी २०२६

**ॲड. शरद आर. सावंत**
बी. कॉम. एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग, विहंग को. ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे आंबिवली त.कोतलखालाटी, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ९/३ | एकूण क्षेत्र ०-२३-८० हे.आर. | २.१२ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेउन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- ०५/०२/२०२६

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

### जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे नसरापुर, ता-कर्जत, जि-रायगड येथील शेती जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक प्रदिप हरीभाऊ पाटील रा-घर नं १८ ए मु - उलवा पनवेल तारघर उलवा जि- रायगड पिन ४१०२०६ याची खालील वर्णन केलेली मौजे नसरापुर येथील मिळकत

**जमीन मिळकत तीचे वर्णन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ५४ | ७ | एकुण क्षेत्रफळ ०.१८.०० हे.आर.पॉ. | ०.१९ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक यांनी आमचे आशिलास सदरची मिळकत ही कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच या इसमाचा अगर संस्थचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन चौदा (१४) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

दिनांक ०५/०२/२०२६

**ॲड. भारत अंकुश सावंत**
(बी.कॉम.एल.एल.बी)
पत्ता- मु पो मोठे वेणगाव
ता. कर्जत, जि. रायगड
संपर्क क्रमांक ९५५२२९६६२२

### जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील, स.नं. १६/१, १६/४, १६/७, १६/८, १७/३, १७/४ क्षेत्र १-४१-१० (हे.आर.), या मिळकतीवरील नियोजित इंद्रप्रस्थ या प्रकल्पातील क्लस्टर II मधील इमारत क्र. ०५ मधील इ विंग मधील रेज्ड दुसऱ्या मजल्यावरील (तिसरा मजला) सदनिका नं. ३०१, एकूण ४३५ चौरस फूट (४० चौ.मी.) क्षेत्रफळाची सदनिका, जिचा ग्रामपंचायत वेश्वी कडील मालमत्ता क्र. ९६२ ई असा असून, सदर निवासी सदनिका श्री. प्रसाद वसंत पाटील व सौ. राधा प्रसाद पाटील, राहणार गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची असून, सदरील सदनिका, सदर सदनिकेच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर सदनिकेचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहे. सदर सदनिका पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर सदनिकेच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित सदनिकेत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून चौदा (१४) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर सदनिका खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ०४/०२/२०२६

सही/-
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड.
खरेदीदाराचे वकील

### महाराष्ट्र शासन

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय**
काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि.रायगड
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेलःddr_rgd@rediffmail.com

जा.क्र.जिउनि/गृह/मोफा क्र.११/मा.अभि./जाहीर नोटीस//सन २०२६ दिनांक :- ०४/०२/२०२६

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

अर्जदार संस्था निकिता अपार्टमेंट हौसिंग सोसायटी लि. बांधीवली, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड तर्फे तर्फे अध्यक्ष शांती शंकर नलावडे यांनी १) शुभांगी गंगाधर पुसाळकर, रा. रूम नं. ५, पहिला मजला, हरदास बिल्डींग, आनंद टॉकीजमागे,जि.ठाणे- ४००६०३ २)मे मोपार बिल्डर्स अँड डेव्हलपर्स प्रा.लि. तर्फे, श्री अब्दुल कादिर परकार, रा. ऑफिस नं.५/७, सय्यद मुखरी इस्टेट, मेरीवाला हाउस,मस्जिद बंदर, मुंबई - ४००००९ ३) मे ओमसाई कन्स्ट्रक्शन तर्फे प्रोपायटर, श्री भास्कर काशिनाथ पाटील, पत्ता- नवपाडा रोड, कुंभार खानपाडा, महेश गवळी चाळ, रूम नं. १०, डोंबिवली पश्चिम, ता. कल्याण, जि. ठाणे- ४२१२०२४) अशोक शिवराज जैन, रा. ब्राह्मणआळी,मु.पो.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड- ४१०१०१ ५) प्रविण लक्ष्मीचंद शंकलेशा, ६) भरत लक्ष्मीचंद शंकलेशा,७) उमरावबाई लक्ष्मीचंद शंकलेशा, ८) राजेंद्र लक्ष्मीचंद शंकलेशा, ९) संजय लक्ष्मीचंद शंकलेशा, १०) मंजू मदनलाल जैन, ५ ते १० रा. ऑफिस गाळा नं. १,२, श्री साईकृपा, बिल्डींग, शेलू, बांदिवली, ता. कर्जत, जि. रायगड १०)श्री साई कृपा एच आय जे सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. मौजे बांदिवली, ता. कर्जत, जि. रायगड तर्फे अध्यक्ष विलास चंद्रकांत डूकरे रा. बांधीवली,श्री साई कृपा, शेलू, शेलू स्टेशनजवळ, ता. कर्जत, जि.रायगड- ४१०१०१ यांचे विरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**गाव बांधिवली,ता. कर्जत, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग - ३४/१, ३४/२.३४/३ याचे एकूण क्षेत्र ६९६० चौ.मी. पैकी ३२९७.८५ चौ.मी.**

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक २४/०२/२०२६रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक ०४/०२/२०२६

**(त.सं.पाटील)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे काविर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. उमेश जगन्नाथ म्हात्रे, रा. आगरसुरे, पो. चोंढी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे अशिलांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| काविर ता. अलिबाग | ७९/१ | १-०५-८०<br>पो.ख. ०-०४-१०<br>एकूण १-०९-९० | १०.३० |

या मिळकतीपैकी श्री. उमेश जगन्नाथ म्हात्रे यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील व मालकीहक्कातील ०-२०-०० हे. आर. मिळकतीबाबत.

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल करावयात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०५/०२/२०२६

सही/-
**ॲड. विवेक रमेश साळवी**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे कोळगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत **श्री. बळवंत अनंत राऊत,** राहणार मुंबई यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झालेली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील **श्री. बळवंत अनंत राऊत** यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु. पेसे) |
|---|---|---|---|
| कोळगाव, ता. अलिबाग. | १६३ | ०-०६-००<br>०-००-८० पो.ख.<br>०-०६-८० एकूण | ०-५२ |

अलिबाग,
दिनांक : ०४/०२/२०२६.

सही/-
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड,
खरेदीदारांचे वकील

राजकीय फेरफटका

# भोईरांचा गेम ओव्हर, राजाभाऊंनाच जनतेचा फेवर


| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

मारामारी, भ्रष्टाचार, पाण्याचा सौदा करुन धनदांडग्यांसोबत हित जोपासणाऱ्या दिलीप भोईरांना जागा दाखविण्याचा विडा जनतेनंच उचलला असल्याचं चित्र सध्या आवास मतदारसंघात दिसून येत आहे. आवास मतदारसंघात जनतेने आता निर्णय घेतला आहे. धूळ, तहान आणि अंधार देणारा कारभार आता पुरे झाला. दयनीय रस्ते, नळ कोरडे आणि महिलांना रात्री पाण्यासाठी भटकावं लागत असताना फार्महाऊस, रिसॉर्टला २४ तास मुबलक पाणी पुरवठा होत आहे. हा विकास नाही, हा जनतेचा अपमान आहे. जनतेच्या पाण्यावर सौदे करणारे, विकासाच्या नावाखाली धूळफेक करणारे, गुंडगिरी, मारहाण करुन आवाज दाबणारे आम्हाला आता नको, अशी प्रतिक्रिया मतदारांकडून व्यक्त होत आहे. त्यामुळे या निवडणुकीत पैसा, दबाव आणि दिखावा बाजूला सारून जनता आपला आवाज निवडणार आहे. म्हणूनच आवासमध्ये परिवर्तन नक्की होणार असल्याची चिन्ह दिसून येत आहेत. परिणामी, भोईरांच्या कारभाराला कंटाळून नागरिकांनी उत्स्फूर्तपणे राजाभाऊंना पाठिंबा दर्शविला आहे.

आवास मतदारसंघातील रस्ते अक्षरशः उद्ध्वस्त झाले असून, धुळीच्या लोटात जनता गुदमरते आहे. पर्यटनाचा गाजावाजा करणारे सत्ताधारी प्रत्यक्षात मात्र रस्ते, पाणी, वीज या मूलभूत प्रश्नांवर सपशेल अपयशी ठरले आहेत, असा घणाघाती आरोप राजाभाऊ ठाकूर यांनी केला. पर्यटनासाठी फोटोसेशन, पण गावकऱ्यांसाठी विकास शून्य, असा बोचरा टोला त्यांनी लगावला. स्थानिकांना डावलून बाहेरच्या ठेकेदारांना कामे दिली जात असून, टक्केवारीचा काळाबाजार खुलेआम सुरू असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. हा विकास नाही, हा लुटीचा धंदा आहे. स्थानिकांचे हक्क मिळवून दिल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा थेट इशारा त्यांनी दिला. पाण्याच्या प्रश्नावर त्यांनी सत्ताधाऱ्यांची निर्घृणता उघडी पाडली. बोडणीपासून अनेक गावांतील महिलांना आजही रात्री जागून पाणी भरावे लागते, ही शोकांतिका आहे, असे ते म्हणाले.

वर्षानुवर्षे सत्तेत असताना पाण्याचा प्रश्न सुटला नाही; पण धनदांडग्यांच्या फार्महाऊसला, रिसॉर्टला मात्र पाणी मुबलक आहे, असा आरोपही त्यांनी केला. धनदांडग्यांना पाणी पाजणारे लोकप्रतिनिधी आता घरी बसले पाहिजेत, असा थेट राजकीय निकाल देत राजाभाऊ ठाकूर यांनी आवास मतदारसंघात परिवर्तनाचे रणशिंग फुंकले आहे.

## आवास मतदार संघातील कार्यकर्त्यांना विश्वास



माजी आ. स्व. मधुकर ठाकूर यांच्याकडून राजकारणासह समाजकारणाचे बाळकडू घेतले आहे. त्यांनी दिलेला वारसा आजही जपण्याचे काम केले जात आहे. या मतदार संघात समाजसेवेच्या नावाखाली लूट केली जात आहे. समाजसेवा कशी अशी असावी, याचे भान राहिले नाही. सध्या जे राजकारण चालू आहे, ते सर्वसामान्यांना न परवडण्यासारखे आहे. ज्यांना जनतेने निवडून दिले. त्यांनाच सुविधांपासून वंचित ठेवण्याचे काम ही मंडळी करीत आहेत. सात फेब्रुवारीला मतदान आहे, आणि नऊ फेब्रुवारील मतमोजणी आहे. येणारी नऊ तारीख आपलीच आहे, अंतरामध्ये येऊन ही निवडणूक लढविली जाईल, असा विश्वास राजाभाऊ ठाकूर यांनी व्यक्त केला.

## शिव्या देणारा दळवींच्या दारात : महेंद्र घरत

- राजाभाऊ ठाकूर हे कार्यकर्त्यांच्या पसंतीचे उमेदवार आहेत. चोंढी ही ऐतिहासिक भूमी आहे. या भूमीत अनेक लढे झाले आहेत. शेकापचे नेते स्व. नारायण नागू पाटील यांनी तालुक्यात खोतीविरोधात लढा दिला. आवास जिल्हा परिषद मतदार संघात राजाभाऊ ठाकूर यांच्याविरोधात उभा असलेला उमेदवार आता शिंदे गटात गेला आहे. विधानसभा निवडणुकीत दळवींविरोधात शिव्या देत होते. आता त्यांच्या दारात गेले आहेत. राजकारण विचित्र आहे. महेंद्र दळवींचे सर्व पक्ष झाले आहेत. सध्या सुरू असलेल्या मक्तेदारीविरोधात लढण्यासाठी शेकाप, काँग्रेससह विविध पक्ष महाविकास आघाडी म्हणून एकत्र आले आहेत. आघाडी अबाधित राहिली पाहिजे. जिल्हा परिषदेवर महाविकास आघाडीचा झेंडा फडकणार, असा विश्वास घरत यांनी व्यक्त केला. रस्ते, पाणी, बेरोजगारीचे प्रश्न सुटले पाहिजेत. त्या पद्धतीने आपण काम करीत आहोत. रस्ते, पाणी हे गरजेचं साधन आहे. खेळाची मैदाने अबाधित राखणे आवश्यक आहे. हक्कासाठी लढलो नाही, तर मुस्कटदाबी होईल. गावांची निर्णायक ताकद राहणार नाही, असे काँग्रेसचे नेते महेंद्र घरत यांनी सांगितले.

## पावलात नाही तर अंतरात येणार...

आवास मतदारसंघात राजाभाऊंना मिळणारा जनसमर्थनाचा लोंढा अधिक मजबूत होत असून, बैलगाडीप्रेमींनी उघडपणे पाठिंबा जाहीर केला आहे. आवास मतदारसंघात राजाभाऊंच्या बाजूने वातावरण तापत असून, बैलगाडीप्रेमींनी ठाम आणि आक्रमक भूमिका घेतली आहे. पावलात नाही तर अंतरात येणार, असा इशारा देत राजाभाऊंसाठी रस्त्यावर उतरून लढण्याची तयारी त्यांनी दर्शवली आहे. ग्रामीण संस्कृती, शेतकरी परंपरा आणि स्थानिकांच्या हक्कांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात राजाभाऊ सातत्याने आवाज उठवत असल्यानेच हा पाठिंबा असल्याचे त्यांनी सांगितले. पैशाच्या जोरावर चालणाऱ्या राजकारणाला कंटाळलेली जनता आता बदलासाठी सज्ज झाली आहे. या लढ्यात राजाभाऊ एकटे नसून, बैलगाडीप्रेमी ताकदीने त्यांच्या पाठीशी उभे असल्याचा स्पष्ट संदेश यावेळी देण्यात आला.

# नागावमध्ये महाविकास आघाडीच्या प्रचाराचा झंझावात



| चौल | प्रतिनिधी |

चौल जिल्हा परिषद मतदारसंघाचे उमेदवार सुरेंद्र म्हात्रे आणि नागाव-रेवदंडा पंचायत समिती मतदारसंघाचे उमेदवार राकेश म्हात्रे यांच्या प्रचाराला नागाव परिसरात जबरदस्त वेग आला आहे. प्रचारासाठी अवघे दोन दिवस शिल्लक असताना बागमळा येथे बुधवारी (दि.४) ग्रामदेवता गावदेवी मातेचे आशीर्वाद घेऊन ज्येष्ठांच्या हस्ते नारळ वाढवत प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर महाविकास आघाडीच्या प्रचाराचा झंझावात आणखी तीव्र झाला असून, मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.







शेतकरी कामगार पक्ष-महाविकास आघाडीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात पोहोचला असून, नागाव परिसरात तो शिगेला पोहोचला आहे. बुधवारी बागमळा येथे आई गावदेवीचा आशीर्वाद घेऊन ज्येष्ठांच्या हस्ते नारळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. नागाव ग्रामपंचायतीच्या माध्यमातून या परिसरात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाल्याने येथील मतदारांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. ''आमचं मत विकासाला, आमचंमतमहाविकासआघाडीला'' असा निर्धार मतदारांनी व्यक्त केल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. त्यामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकू लागली आहे. प्रारंभी नागावचे माजी उपसरपंच संदेश नाईक यांच्या निवासस्थानी कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमले. त्यानंतर ग्रामदेवता गावदेवी मातेचे आशीर्वाद घेऊन चौल जिल्हा परिषद मतदारसंघाचे उमेदवार सुरेंद्र म्हात्रे आणि नागाव-रेवदंडा पंचायत समिती मतदारसंघाचे उमेदवार राकेश म्हात्रे यांच्या प्रचाराचा शुभारंभ स्थानिक ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आला.

यावेळी नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर, माजी सरपंच नंदकुमार मयेकर, माजी सरपंच निखिल मयेकर, माजी उपसरपंच संदेश नाईक, माजी उपसरपंच संतोष घरत, विजय चौलकर, शेकाप नेते आर.डी. नाईक, रेवदंडा शेकापचे ज्येष्ठ नेते सुरेश खोत, रेवदंडा शहराध्यक्ष निलेश खोत यांच्यासह बागमळा येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकरी कामगार पक्ष आणि शिवसेनेच्या माध्यमातून या भागात मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाल्यामुळे येथील मतदार महाविकास आघाडीच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर यांनी सांगितले. नागाव परिसरातील गावांमध्ये विविध विकासकामे आणि योजना राबविण्यात आल्या आहेत. नागावमधील मतदार सुज्ञ असून, ते महाविकास आघाडीच्या उमेदवारांना भरघोस मतदान करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# प्रामाणिक कामाची जनता दखल घेईल

## विलास फडके यांचा ठाम विश्वास



| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या ७ तारखेला होणाऱ्या निवडणुकांच्या प्रचाराला वेग आला असून 'निर्धार विकासाचा, संकल्प विजयाचा' या भूमिकेतून प्रचार सुरू आहे. अशी ठाम भूमिका शेकाप-महाविकास आघाडीचे आदई पंचायत समितीचे उमेदवार विलास फडके यांनी मांडली. नेरे जिल्हा परिषद गटात प्रचारादरम्यान जनतेशी संवाद साधताना ते बोलत होते.

यावेळी विलास फडके यांनी सांगितले की, या ठिकाणी पाणीटंचाईचा प्रश्न हा अत्यंत गंभीर आहे. आठवड्यातील फक्त दोन दिवस पाणी येते, तर उर्वरित दिवशी पाणीच उपलब्ध नसते, अशी व्यथा नागरिकांनी व्यक्त केली. हा प्रश्न प्रशासनाने गांभीर्याने घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, दादागिरी व पैशाच्या बळावर निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना आता जनता थारा देणार नाही. जनतेला विकास, प्रामाणिकपणा आणि सातत्याने संपर्कात राहणारे प्रतिनिधी हवे आहेत. याआधी निवडून आलेल्या प्रतिनिधींनी निवडणुकीनंतर कधीही मतदारांशी संपर्क ठेवला नाही. जनतेच्या समस्या, अडचणी व विकासकामांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे. मी नेहमीच जनतेच्या समस्या समजून घेत काम करत आलो आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. माझ्या कामाची दखल जनता यावेळी नक्कीच घेईल, असा विश्वास फडके यांनी व्यक्त केला. यावेळी अदाई पंचायत समिती गणाचे उमेदवार विलास फडके यांच्यासह नेरे जिल्हा परिषद गटाचे उमेदवार मारुती भस्मा, शेकाप व महाविकास आघाडीचे कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

(पान १ वरुन)



# गरीबाला विसरु नका : जयंत पाटील

जोपर्यंत शेकाप व जयंत पाटील जिवंत आहे, तोपर्यंत खारेपाटासह स्थानिकांवर अन्याय होऊ देणार नाही. आपला खारेपाट आगरी कोळीसह अनेक समाजांचा आहे. या भागात तिसरी मुंबई येत आहे. या मुंबईत आपला स्थानिक टिकला पाहिजे. यासाठी सर्वांनी जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे. तिसऱ्या मुंबईचा उपयोग खारेपाटाच्या उन्नतीसाठी करायचा आहे. निवडून आल्यावर गरीबांना विसरु नका, तुम्हाला कधीच कमी पडणार नाही, असा मोलाचा सल्ला जयंत पाटील यांनी उमेदवारांना दिला.



## मतदारच संधीचे सोने करणार : पूजा भगत

शेकापने ही उमेदवारी सर्वसामान्य कुटुंबातील एका मुलीला दिली आहे. शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील, सुप्रिया पाटील, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील आणि ॲड. गौतम पाटील यांनी ठेवलेला विश्वास कार्यकर्त्यांच्या भरोवशावर सार्थक करून दाखवीन. या मिळालेल्या संधीचे सोने करण्यासाठी सर्वांनी कामाला लागा. एक-एक मत महत्त्वाचे आहे. आजच्या या सभेत जमलेली जनता हाच माझा विजय आहे, असा विश्वास आंबेपूर जिल्हा परिषद मतदार संघातील उमेदवार पूजा भगत यांनी जाहीर सभेत व्यक्त केला.



## विरोधक मतदारांची दिशाभूल करताहेत : छाया पिंगळे

महाविकास आघाडीमार्फत ही निवडणूक लढविली जात आहे. प्रचार सभेत भव्य दिव्य स्वरुपात जमलेले कार्यकर्ते हीच खरी विजयाची नांदी आहे. या मतदार संघातील विरोधकांचे उमेदवार विकास कामे केल्याची जाहिराती करीत आहेत. परंतु, कोणत्या गावाचा विकास केला हे दाखवून द्या, असा टोला भाजपच्या उमेदवारांना नाव न घेता लगावला. तसेच विरोधकांचे दुसरे उमेदवार गावांतील अंधार दूर केला, अशी जाहिरात करीत आहेत. मात्र, कोणत्या गावाचा अंधार दूर केला, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. चुकीच्या जाहिराती करून मतदारांची दिशाभूल करण्याचे काम विरोधक करीत आहेत, असा टोला रसिका केणी यांना लागवला. या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवार पूजा भगत यांना भरघोस मतांनी मतदार निवडून देतील, असा विश्वास शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या छाया पिंगळे यांनी व्यक्त केला.



## भरघोस मतांनी निवडून द्या : सुनील पाटील

मागील निवडणुकीप्रमाणे ही निवडणूकदेखील शेतकरी कामगार पक्षासोबत काँग्रेस महाविकास आघाडी म्हणून एकत्र लढत आहे. या निवडणुकीत जिंकण्यासाठी सर्वांनी एक दिलाने काम करायचे आहे. खटारा या चिन्हासमोरील बटण दाबून महाविकास आघाडीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून द्या, असे आवाहन काँग्रेसचे नेते सुनील पाटील यांनी केले. सध्याचे राजकारण पाहता देशाचे संविधान तसेच लोकशाही टिकविण्यासाठी विरोधकांच्या कोणत्याही अपप्रचाराला बळी पडू नका, असेही त्यांनी सांगितले.







# करार, की ट्रम्पचा आदेश?

ट्रेड डील म्हणजे व्यापार करार. करार हा दोन व्यक्ती किंवा पक्षांमध्ये समान पातळीवरून होतो. या व्यक्ती समोरासमोर बसून एक व्यवहार ठरवतात. दोन देशांमध्ये जेव्हा असा करार होतो तेव्हा दोन्ही देशांचे नेते गाजावाजा करून एकत्रितपणे त्याची घोषणा करतात. अलिकडेच भारतान युरोपीय महासंघाशी केलेला करार हा अशा प्रकारचा होता. युरोपीय महासंघाच्या प्रमुख व युरोपीय कौन्सिलचे अध्यक्ष हे दोघेही त्यासाठी इथे आले. हा करार म्हणजे मदर ऑफ ऑल डील्स – किंवा सर्व करारांचा असल्याचे वर्णन मोदींच्या प्रेमात बुडालेल्या मिडियाने केले. पण अमेरिकेसोबतचा भारताचा व्यापार करार आळंदीला जाऊन गुपचूप लग्न उरकावे तसा उरकण्यात आला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी त्याची एकतर्फी घोषणा केली. त्यानंतर तीन-चार तासांनी मोदी सरकारातील मंत्री व खुद्द मोदी यांनी याबाबतचे ट्विट्स केले. कालपर्यंत जे ट्रम्प भारताला येता-जाता शिव्या घालत होते त्यांचे एकाएकी हृदय परिवर्तन कसे झाले हे एक मोठे गूढ आहे. याबाबतचा घटनाक्रम अत्यंत विचित्र आहे. सोमवारी रात्री सव्वानऊच्या सुमाराला अमेरिकी राजदूत गोर यांनी ट्रम्प व मोदी यांच्यात फोनवरून संभाषण झाल्याचे सांगून लवकरच मोठी घोषणा होत असल्याचे सांगितले. मग रात्री बारा वाजता ट्रम्प यांनी सोशल मिडियावरून लांबलचक मेसेज प्रसिध्द केला. पंतप्रधान मोदींसोबत आज सकाळी माझे बोलणे झाले. मोदी हे माझे सर्वात मोठे मित्र आहेत अशी स्तुती करून मग ट्रम्प यांनी या कराराची परस्पर घोषणा करून टाकली. भारताला यामध्ये करण्यासारखे काहीच उरले नाही. यापूर्वी इंग्लंड, जपान किंवा अन्य बड्या देशांचे नेते अमेरिकेत गेले व त्यांच्यात रीतसर करार झाले. मोदी तर ट्रम्प यांच्यापासून ऑपरेशन सिंदूर झाल्यापासून पळ काढत आहेत. भारत व पाकिस्तानचे युध्द आपणच थांबवले हा ट्रम्पतात्यांचा आग्रह कायम आहे. मोदींच्या छप्पन इंची छातीला त्यामुळे छप्पन इंची भोके पडली आहेत. ट्रम्प यांच्या दबावामुळेच तेव्हा भारताने युध्द थांबवले असा सर्वांचा ग्रह झाला आहे. आता, ज्या रीतीने ट्रम्प यांनी याची परस्पर घोषणा करून टाकली त्यावरून अमेरिकेच्या दबावामुळेच हा करार झाला आणि आपण त्याला केवळ मुंडी हलवत आहोत असे चित्र निर्माण झाले आहे.

### बस चुकली होती..

ट्रम्प यांनी गेल्या वर्षी भारतावर आधी २५ टक्के व नंतर ५० टक्के आयातशुल्क लावण्याचा निर्णय घेतला होता. सर्व जगात सर्वाधिक शुल्क हे भारत, ब्राझील इत्यादी देशांवर ५० टक्के होते. या संदर्भात गेल्या एप्रिल महिन्यापासून दोन्ही देशांमध्ये वाटाघाटी चालू होत्या. आता हा करार झालाच अशी घोषणा आपला व्यापारमंत्री गेले काही महिने सतत करीत होते. पण प्रत्यक्षात तो होत नव्हता. त्यानंतर मोदी ट्रम्पना फोन करीत नसल्याने करार मागे पडला व आता भारताची बस चुकली असे वक्तव्य अमेरिकेच्या मंत्र्यांनी केले. भारत अमेरिकेला प्रचंड निर्यात करतो. त्या मानाने तेवढी आयात करीत नाही. त्यामुळे भारताला सुमारे ४६ अब्ज डॉलरचा फायदा होतो. ते पाहून ट्रम्प यांचे डोके फिरलेले होते. भारताने आपल्याक़डून दूध, दुधाचे पदार्थ, सोयाबीन, मका इत्यादी गोष्टी खरेदी कराव्यात असा आग्रह त्यांनी धरला. भारताला अर्थातच हे शक्य नव्हते. त्यावरूनच घोडे अडले आहे असे सर्वांना वाटत होते. आपल्याला वैयक्तिक किंमत चुकवावी लागली तरी चालेल, पण शेतकऱ्यांचे नुकसान होऊ देणार नाही असे बाणेदार उद्गार एका सभेत काढून मोदींनी टाळ्या मिळवल्या होत्या. ट्रम्प ज्या ठिकाणी असतील तिकडे जाण्याचेही मोदी टाळू लागले होते. त्याच दरम्यान ट्रम्प यांनी मोदी आपल्या भेटीसाठी कसे अजीजीने विनंती करीत होते असे सांगून त्यांची टर उडवली. भारत व पाकिस्तान यांच्यातले युध्द आपणच थांबवले हा त्यांचा हेकाही कायम होता. असे असताना एकाएकी बदल कसा झाला हे गूढ आहे. ट्रम्प आणि मोदी यांच्यात संवाद होतो, ट्रम्प हे मोदींना आपला सर्वोत्तम मित्र म्हणतात, आणि करार जाहीर करतात आणि दुसरीकडे काही तासांनी हळूच बिळातून बाहेर यावे तसे बाहेर येऊन मोदी, गोयल आणि आपले शेतीमंत्री या कराराबद्दल आनंद व्यक्त करतात हे आश्चर्यकारक आहे.

### मानेवर सुरी?

विशेष म्हणजे करार नेमका काय झाला हे अजून जाहीर झालेले नाही. भारतावरचे आयातशुल्क त्यांच्या विनंतीनुसार २५ वरून १८ टक्के करण्यात येईल आणि भारत अमेरिकेच्या मालावरचे आयातशुल्क काढून टाकून ते शून्यावर आणतील असा मोठा दावा ट्रम्प यांनी केला आहे. यातील शुल्क १८ टक्क्यांवर आणण्याच्या निर्णयाचे भारताने स्वागत केले आहे. पण अमेरिकी मालावरचा कर रद्द करण्याच्या घोषणेबाबत मात्र मौन बाळगले आहे. दुसरीकडे भारत रशियाकडून तेल खरेदी करणे बंद करील व अमेरिकेकडून अधिक तेल घेईल असेही ट्रम्प यांनी परस्पर जाहीर केले आहे. भारत अमेरिकेकडून एकूण सुमारे ५०० अब्ज डॉलरचा माल खरेदी करील असेही ते म्हणाले आहेत. याबाबतही मोदी वा गोयल काही बोलायला तयार नाहीत. भारतातील शेतकरी, दुधाचे उत्पादक व मच्छिमार यांच्या हिताचे रक्षण करण्यात आम्ही यशस्वी ठरलो आहोत असा दावा गोयल यांनी केला आहे. पण मग ट्रम्प यांच्या म्हणण्यानुसार जी ५०० अब्ज डॉलरची आयात व्हायची आहे ती कशाची आहे व त्यात आपण आपल्या मानेवर सुरी चालवू दिली आहे का याचा स्पष्ट उलगडा व्हायलाच हवा. ट्रम्प यांचा आजवरचा कारभार पाहता भारताकडून भरपूर काही पदरात पाडून घेतल्याखेरीज ट्रम्प कोणताही करार करणार नाहीत व भारताची इतकी स्तुती करणार नाहीत. तेलाचे म्हणाल तर गेल्या वर्षभरातच भारताने अमेरिकेतून करण्यात येणारी तेल आयात दुप्पट केली आहे. कालपरवा, अमेरिका डेटा सेंटर कंपन्यांना २०४७ पर्यंत कोणताही कर लागू होणार नाही असे अर्थसंकल्पात जाहीर केले आहे. भारताने युरोपसोबत केलेल्या करारामुळे ट्रम्प यांना चिंता वाटत होती हे खरे आहे. राजकीयदृष्ट्या देखील भारत अमेरिकेपासून दूर जात आहे असे त्यांना वाटू लागले होते. चीनला शह देण्यासाठी त्यांना भारताची गरज आहे. हे सर्व जमेस धरले तरीही हा करार सहजासहजी झालेला नाही. तेवढ्याच मुळे तो व्हायचा असता तर आधीच झाला असता. आता अमेरिकेने भारताचे नाक दाबून त्याच्याकडून काही अटी मंजूर करून घेतल्या असाव्यात व नंतरच हा करार झाला असावा अशी भरपूर शक्यता आहे. तसे नसते तर दोन्ही बाजूच्या प्रतिनिधींच्या संयुक्त बैठकीत त्याची घोषणा झाली असती. ट्रम्प यांनी एकतर्फी घोषणा केली आहे याचाच अर्थ भारताला त्यांनी आपल्या मागून यायला लावले आहे. दुर्दैवाने इतका मोठा व बऱ्याच दिवसांपासून ज्याची वाट पाहिली जात होती अशा कराराचा तपशील अजून उपलब्धच नाही. त्याविषयी केवळ तर्कवितर्कच केले जात आहे. भारताच्या दृष्टीने पाहिले तर तेच अत्यंत घातक आहे. आपण नेमके काय गमावले आहे हे मोदी सरकार स्वतःच्या तोंडाने सांगण्याची सुतराम शक्यता नाही. माध्यमांनाच ते शोधून काढावे लागेल.

विचार

# आरक्षणाचा ताजा अध्याय

***देशात आरक्षणात आरक्षण हा नवा मुद्दा गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. आरक्षणाचा फायदा घेणारे काही समाजघटक समाजातील अन्य लोकांना आरक्षणाच्या फायद्यापासून वंचित ठेवतात. श्रीमंत, राजकारणी आणि अधिकारी कुटुंबातील व्यक्तींनी तरी किमान आरक्षणाचा फायदा घेऊ नये, असे सार्वत्रिक मत आहे. सर्वोच्च न्यायालयाने त्याबाबत आता पुढचे पाऊल उचलले असले, तरी निर्णय सरकारने घ्यायचा आहे.***



**प्रा. अशोक ढगे**

देशात सध्या आरक्षणाबाबत वाद सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच केंद्र आणि राज्य सरकारांना नोटीस बजावून अनुसूचित जाती-जमातींमध्ये 'क्रिमी लेयर' लागू करण्याबाबत मत मागितले आहे. आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय, इतर मागासवर्गीयांसाठी 'क्रिमी लेयर' लागू असताना या दोन समाजघटकांना का लागू नाही, असा प्रश्न उपस्थित होत होता. त्याबाबत भाजपचे नेते आणि वकील अश्विनी उपाध्याय यांनी याचिका दाखल केली आहे. त्यांचा युक्तिवाद आहे, की सरकारी नोकऱ्या किंवा संवैधानिक पदांवर असलेल्या एससी/एसटी व्यक्तींना आरक्षणाच्या कक्षेतून वगळले पाहिजे. आर्थिक स्थितीचा युक्तिवाद हा एससी/एसटी आरक्षणासाठी बराच काळ आधार मानला पाहिजे. इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षणासाठी अशी व्यवस्था आधीच अस्तित्वात आहे. या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाची भूमिकादेखील लक्षणीयरीत्या बदलली आहे. भारतीय संविधानाच्या कलम १५(४) आणि १६(४) अंतर्गत एससी/एसटी आरक्षण दिले जाते. या कलमांनुसार राज्याला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीयांसाठी शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये विशेष तरतुदी (जसे की आरक्षण) करण्याची परवानगी मिळते. या वर्गांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेणे आणि समान संधी प्रदान करणे, हा यामागील उद्देश आहे. हे पहिल्या घटनादुरुस्ती (१९५१) द्वारे जोडले गेले. यापैकी कलम १५(४) शिक्षणातील आरक्षणाशी संबंधित आहे आणि १६(४) सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षणाशी संबंधित आहे. आरक्षणाचा मुद्दा आला, की त्यावर टोकाची मते व्यक्त होतात. मात्र न्यायालयाचे मत समजून घ्यायला हवे.

आरक्षण हे आर्थिक आधारावर असावे, जातीच्या आधारावर नसावे असे मानणारा मोठा वर्ग आहे. उच्चरवात तो म्हणणे मांडत असतो. आरक्षणाचा समर्थक दुसरा वर्ग राज्यघटनेने आम्हाला आरक्षण दिले आहे आणि तो आमचा हक्क आहे, असे म्हणणे मांडत असतो. सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती बदलत असल्याने आता आरक्षणाच्या सवलती मागणारे समाजघटक वाढले आहेत. आरक्षणाची स्थिती रेल्वेच्या डब्यातील प्रवाशांसारखी असते. रेल्वेच्या डब्यात शिरण्यासाठी फलाटावरील प्रवासी धडपडत असतात. डब्यातील प्रवासी मात्र फलाटावरील प्रवाशांना आत येऊ देण्यास तयार नसतात. डब्यात अगोदरच गर्दी असतानाची ही स्थिती आहे. फलाटावरील व्यक्ती रेल्वेच्या डब्यात शिरल्या, की आतल्या होऊन जातात आणि पुढच्या स्टेशनवर बाहेरच्या प्रवाशांना आत येऊ देत नाहीत. आरक्षणाची अवस्था तशीच आहे. आरक्षणाचा फायदा अगोदरच घेणारे लोक आपल्याच समाजघटकांना त्याचा फायदा मिळू देत नाहीत, तर दुसऱ्या समाजघटकांनी आरक्षणाची मागणी केली, तर त्याला विरोध केला जातो. आरक्षण आर्थिक निकषावर हवे, अशी मागणी करणाऱ्यांच्या दोन गोष्टी लक्षात येत नाहीत. एक तर घटनाकारांनी आरक्षणाचा निर्णय घेतला, तेव्हा ज्या समाजघटकांना आरक्षण दिले, ते आर्थिकदृष्ट्या दुर्बल होते आणि आरक्षण हा काही गरिबी निर्मूलनाचा मार्ग नव्हे. सामाजिक मागासलेपण दूर करणे आणि समान संधी देणे हा आरक्षणाचा उद्देश होता. अनुसूचित जाती आणि जमातींना त्यांच्या आर्थिक स्थितीवर नव्हे, तर ऐतिहासिक सामाजिक वंचिततेवर आधारित आरक्षण देण्यात आले.

अनुसूचित जाती आणि जमातींविरुद्ध भेदभाव हा आर्थिक घटकांवर आधारित नसून जातीय ओळखीवर आधारित आहे. अनुसूचित जाती आणि जमातींच्या आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयाचे मत वेळोवेळी बदलत राहिले आहे. इंदिरा साहनी विरुद्ध भारतीय संघराज्य खटल्यातील १९९२ मधील निर्णय आरक्षणावरील निर्णायक निवाडा मानला जातो. या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायाधीशांच्या खंडपीठाने ओबीसी आरक्षणाची वैधता कायम ठेवली. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने इतर मागासवर्गीय (ओबीसी) वर्गाच्या आरक्षणात 'क्रिमी लेयर' लागू करण्याचे आदेश दिले; परंतु 'क्रिमी लेयर'मधून एससी-एसटी आरक्षण वगळले. न्यायालयाने युक्तिवाद केला, की एससी-एसटी वंचिततेचे मूळ कारण सामाजिक भेदभाव आहे, आर्थिक स्थिती नाही. त्यानंतर, २००६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने एम. नागराज विरुद्ध भारतीय संघ खटल्यात अनुसूचित जाती आणि जमातींसाठी पदोन्नतीमध्ये आरक्षणाला परवानगी दिली. न्यायालयाने पदोन्नतीमध्ये 'क्रिमी लेयर' आरक्षणाची मागणी फेटाळून लावली. या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने असेही म्हटले आहे, की अनुसूचित जाती-जमाती आरक्षणाचा उद्देश सामाजिक मागासलेपणा भरून काढणे आहे. गेल्या सात दशकांपासून, राजकीय पक्ष आणि नेत्यांनी जनतेचे मानसशास्त्र विकृत केले आहे. प्रत्येकजण आरक्षणाला त्यांच्या समस्यांचे निराकरण म्हणून पाहतो. एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात किती लोकांना आरक्षणाचा फायदा होईल, याचा कोणीही विचार करत नाही. सामाजिक न्यायासाठी आरक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही का, आपण नेहमीच आरक्षणासाठी लढणार का हे बघितले जात नाही.

कधी कधी दिसते, की राजकीय पक्ष जनतेला आरक्षणात गुंतवून स्वार्थी हेतू साध्य करत आहेत. ग्रीक तत्वज्ञ प्लेटो म्हणाले होते, की चांगले नेते जनतेला अमर्याद संसाधनांकडे घेऊन जातात, तर वाईट नेते जनतेला मर्यादित संसाधनांकडे घेऊन जातात. मर्यादित संसाधने जनतेमध्ये संघर्ष आणि द्वेष निर्माण करतात. आरक्षण हे असे साधन आहे, जिथे पर्याय मर्यादित असतात आणि इच्छुक भरपूर असतात. दुसरीकडे, स्वयंरोजगार हे अमर्याद क्षेत्र आहे. तरुणांना त्याकडे प्रेरित करणे हा एका चांगल्या नेत्याचा गुण असतो. सामान्य वर्गातील तरुणांना समजत नाही, की त्यांना पूर्वीच्या शोषणकारी व्यवस्थेचे परिणाम भोगावे लागत आहेत. त्यात त्यांची कोणतीही भूमिका नव्हती. मुस्लिम समुदायातील ८५ टक्के लोक पसमंदा मुस्लिम आहेत. ते धर्मांतरित दलित, शोषित आणि मागासलेले हिंदू आहेत. त्यांना आरक्षणाचे फायदे मिळत नाहीत. दलित आणि मागासवर्गीयांमध्येही असे अनेक उपवर्ग आहेत, ज्यांना आरक्षणाचे कोणतेही फायदे मिळालेले नाहीत. आपण त्यांचीही काळजी करू नये का? या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय 'जात'ऐवजी 'वर्ग' हा आरक्षणाचा आधार बनवण्याच्या कल्पनेला पुढे नेण्यास मदत करेल. यामुळे केवळ जातीच्या राजकारणावर हल्ला होणार नाही, तर जात हा वर्गआधारित सामाजिक रचनेचा पाया बनेल. समाजातील प्रत्येकाला प्रगती करण्याची आणि पुढील वर्गात जाण्याची संधी मिळेल.

आरक्षण धोरण बदलणे हा एक गुंतागुंतीचा आणि संवेदनशील मुद्दा आहे. जाती-आधारित आणि आर्थिक-आधारित आरक्षणाचे फायदे आणि तोटे आहेत. या मुद्द्यावर सखोल चर्चा करणे आणि सामाजिक न्याय आणि आर्थिक समानता सुनिश्चित करणारे संतुलित धोरण तयार करणे आवश्यक आहे. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात आरक्षण धोरणाचे उद्दिष्ट समाजातील सर्व घटकांना, मग ते जातीवर आधारित असो किंवा आर्थिक स्थितीवर आधारित असो; समान संधी प्रदान करणे हे असले पाहिजे. तथापि, या बदलामागील राजकीय हितसंबंध आणि सामाजिक विभाजनाचे धोके दुर्लक्षित करता येणार नाहीत. हा मुद्दा केवळ आरक्षण धोरण बदलू शकत नाही, तर भारतीय समाजाच्या रचनेवरदेखील परिणाम करू शकतो. सारांश म्हणजे समाजातील सर्व घटकांना देशाच्या संसाधनांमध्ये आणि राजकारणात समान वाटा मिळावा याची खात्री करणे.
सर्वोच्च न्यायालयाने जातीमध्ये पोटजातीच्या आरक्षणाचा विषय मांडला होता. तो सरकार आणि दलित नेत्यांनीही नाकारला. वास्तविक, आरक्षणाचे फायदे घेणाऱ्यांच्या पुढच्या पिढीने ते नाकारून आपल्याच उपेक्षित बांधवासाठी फायदा मिळवून दिल्यास आरक्षणाचा फायदा घेऊन सर्व लोक समान पातळीवर येऊ शकतील.

# जिल्ह्यात घुमतोय खटाऱ्याचा नाद

**संतोष राऊळ**

महानगरपालिका आणि नगरपरिषदेच्या निवडणूका नुकत्याच पार पडल्या. यावेळी रायगड जिल्ह्यात महाविकास आघाडीने उसंडी घेत आपले वर्चस्व प्रस्थापित केले. याच महाविकास आघाडीचा भाग असलेला शेतकरी कामगार पक्ष देखील आपले वर्चस्व टिकवून आहे. गेल्या काही वर्षांत राज्याने मोठ्या प्रमाणात गद्दारी पाहिली. ज्या पक्षाने त्यांना मोठं केलं, नाव दिलं, महत्वाचं पद दिलं त्यांनीच त्या पक्षाशी गद्दारी केली. त्याला शेतकरी कामगार पक्ष देखील मुकला. ज्यांच्यावर पक्षाची महत्वाची धुरा सोपावली त्यांनीच धोका दिला. मात्र, तरीदेखील शेतकरी कामगार पक्ष तग धरून आहे. सध्या जिल्हा परिषद आणि पंचाय समितींच्या निवडणूकीचा बिगूल वाजलेला आहे. रायगड जिल्ह्यात सर्व पक्षीयांनी आपले वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी सर्वोतपरी ताकद लावली आहे. मात्र, यावेळी शेतकरी कामगार पक्ष-महाविकास आघाडीच्या प्रचाराचा बोलबाला आहे. त्यातच जिल्ह्यात पुन्हा एकदा शेतकरी कामगार पक्षाच्या खटाऱ्याचा नाद घुमत असून तो चर्चेचा विषय ठरत आहे.

सन २०१९ साली शेतकरी कामगार पक्षाला विधानसभा निवडणूकीत पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यानंरत पक्षाच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उभे राहत होते. त्यांनतर २०२४ साली देखील शेतकरी कामगार पक्षाने उच्च शिक्षित आणि उमदा उमेदवार विधानसभा निवडणूकीत उभे केले होते. तरी पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यावेळी शेतकरी कामगार पक्षात देखील गद्दारी झाली होती. त्यावेळचा पराभव हा पक्षाचे नेते आणि उमेदवारांपेक्षा जास्त सर्वसामान्य कार्यकर्ता आणि जनतेच्या जिव्हारी लागला होता. त्यानंतर देखील शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता न डगमगता कोणत्याही भुलथापांना बळी न पडता पुन्हा एकदा जोमाने कामाला लागला. यावेळी शेतकरी कामगार पक्षासोबत महाविकास आघाडीतील घटक पक्षांची मोठी ताकद उभी आहे. त्याचा प्रत्यय महापालिका आणि नगरपरिषदेत आला आहेच. आता जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत सत्ताधिकाऱ्यांना धडकी भरल्याची चर्चा सर्वत्र होताना दिसत आहे.

शेतकरी कामगार पक्षाची खरी ओळख लाल बावटा आणि खटारा चिन्ह ही आहे. मात्र, २०१९ नंतर तांत्रिक कारणास्तव खटारा या चिन्हावर शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवारांना निवडणूक लढवता आली नाही. त्यामुळे विविध चिन्हांवर निवडणूका लढविण्याची वेळी पक्षाला आली होती. मात्र, आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूकीसाठी शेतकारी कामगार पक्ष 'खटारा' या चिन्हावर निवडणूक लढवित आहे. शेतकरी कामगार पक्षाची खरी ओळख असलेलं चिन्ह पुन्हा मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

शेतकरी कामगार पक्षाच्या काही पराभवांमुळे विरोध आणि सत्ताधिकाऱ्यांमधून 'शेकाप संपला'चे सातत्याने सुर उमटतं होते. असे असतानाही रायगड जिल्हा लाल बावट्याने रंगत चालला आहे. तसेच, खटाऱ्याचा नाद देखील सर्वत्र घुमत आहे. हीच 'शेकाप संपला' बोलणाऱ्यांना कार्यकर्त्यांची चपराक आहे.

विशेष म्हणजे खरचं 'शेकाप संपला' असता तर विरोधकांना 'शेकाप संपला'ची बोंब उठवीच लागली नसती. खरंतर काही भुल थपांना बळी पडलेली सर्वसामान्य जनता पुन्हा लाल बावट्याकडे वळत आहे. त्यामुळे भिती पोटी आपले कार्यकर्ते आणि उरली सुरलेली जनता आपल्या पाठिशी ठाम राहावी म्हणून विरोधकांकडून अशी खोटी बोंब उठवली जात आहे. आता विकासाच्या रस्त्यावर चालणारा शेतकरी कामगार पक्षाचा 'खटारा' म्हणजेच बळीराजाच्या स्वाभिमानाच्या रथासोबत भ्रष्टाचारी अंधारात सत्याची वाट दाखवणारी शिवसेनेची मशाल, भ्रष्टाचार रोखण्यासाठी काँग्रेसचा हात आणि सत्याचा विजय साजरा करणारा राष्ट्रवादीचा तुतारी वाजवणारा माणूस सोबत आहेत. तसेच, जिल्ह्यात एकटा खटारा महाविकास आघाडीच्या पाठीमागे ठामपणे उभा आहे. त्यामुळे विरोधक आणि सत्ताधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

पक्ष फुटला, कार्यकर्ते सोडून गेले, जनता हतबल झाली, मात्र शेतकरी कामगार पक्षाची संघटना एकजूटीने उभी राहिली. असे कितीतरी पक्ष आले गेले आणि संपले. मात्र, संघटना कधी संपत नाही. चळवळीतून उभी राहिलेली संघटना शेवटपर्यंत लढत राहते. त्याची नांदी जिल्हा परिषदेच्या निवडणूकीतून दिसेलच, असा ठाम विश्वास कार्यकर्त्यांमधून उमटताना दिसत आहे. तसेच, कठिण काळात जो आपल्या पक्षासोबत ठामपणे नाही राहिला तो सर्वसामान्य जनतेच्या वाईट काळात कसा उभा राहिल, अशी देखील चर्चा सर्वत्र होत आहे.

सध्या प्रचाराची धामधुम सुरू असून जिल्ह्यात सर्वत्र महाविकास आघाडीसह शेकापच्या 'आला खटारा आला'चा नाद घमुत आहे. जिल्हा पुन्हा लाल बावटेमय होत असून एक वेगळाच उत्साह कार्यकर्त्यांमध्ये आहे. त्यामुळे 'विजय आपलाच' अशा भावना शेकापसह महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहेत.

लोकसंसद

## बनणारे चुकीचे स्पीडब्रेकर

गाड्यांच्या वेगाला नियंत्रण ठेवण्यासाठी आणि भरधाव वेगाने होणारे अपघात टाळण्यासाठी स्पीडब्रेकर रस्त्यावर बनवले जातात. आज ज्या पद्धतीचे जे स्पीडब्रेकर बनवले जातात ते चुकीचे आहेत. त्या स्पीडब्रेकर वरून जाणारी प्रत्येक



गाडी जरूर थांबते. गाडीचा स्पीड शुन्यावर आला तरी गाडी स्पीडब्रेकरवरून जाताना आपटते. ज्यांनी गाडीत बसलेल्या किंवा गाडीवर बसलेल्या प्रत्येक माणसाला त्याचा गचका लागतो. ज्याने कंबर व मणक्यांचे आजार तयार होतात. मानेला गचका लागतो. थोड्या वेळात गाडी असली तरी ब्रेक लावून वेग शुन्यावर आणायला लागते. स्पीडब्रेकर हा जमिनीपासून सहा ते आठ इंच उंच असावा. (मूळ रस्त्यापासून) स्पीड ब्रेकरच्या मध्यापासून दोन्हीकडे तीन फूट उतरता असावा. एकीकडे तीन फूट व दुसरीकडे तीन फूट सरळ उतरता असावा. एकीकडे तीन फूट व दुसरीकडे तीन फूट सरळ उतरता असावा. मध्यभागी अर्धा फूट त्यांना गोलाई असावी. अशा स्पीडब्रेकर वरून जाताना गाडीचा वेग कमी करायला लागतोच. पण गाडीतून किंवा गाडीवरून प्रवास करणाऱ्याला कोणताही गचका न लागता गाडी कमी वेगात पुढे जाते. अशा स्पीडब्रेकर मुळे माणसाला त्रास कमी होतो. असे स्पीडब्रेकर बनले तर प्रवास सुखाचा होईल.

**–प्रदीप गणपत पाटील, नागडोंगरी**

## झाकली मूठ सव्वालाख डॉलर्सची?

कोणे एके काळी विरोधात असणारे आज सत्तेवर बसले परंतु त्यावेळीस तत्कालीन सरकारच्या धोरणांवर किंवा त्यांच्या होणाऱ्या करारावर टीका करून आज सत्तेत आलेले नकळत आपणही त्याच मार्गाने जात आहोत. याचे भान त्यांनाच राहिले नाही. स्वदेशीचा नारा देऊन विदेश अमेरिका आणि चीन सारख्यांना भारतीय बाजारपेठा उघड्या करून कोणते राष्ट्रकार्य? राष्ट्रप्रथम कर्तव्य मानणाऱ्यांनी केले? मग त्या स्वदेशीच्या नाऱ्याचे काय करायचे? भारत कृषीप्रधान देश आहे.हे आम्हांला शाळेत बालवयातच शिकविले गेले आहे.मग भारतीय कृषी बाजारपेठ मुक्त करून केंद्राला नक्की काय साध्य करायचे आहे.अमेरिकी दुधजन्य पदार्थ हे भारतीय नव्हे ''हिंदु'' स्थानात येणार परंतु, अमेरिकेतील गायींच्या पोषणात अभक्ष्यही असते. अशा निषेधार्ह पदार्थांवर पोसलेल्या गायींचे दूध आणि दुग्धजन्य पदार्थ हिंदुस्थानी कसे काय स्वाहा करणार?ट्रम्प यांनी टेरिफ कमी केला आणि भारताकडून शून्य टेरिफची अपेक्षा करतात आणि तसे जाहीर वक्तव्य सुद्धा करतात इथे मात्र झालेल्या कराराचा तपशील उघड होणे अपेक्षित होता.पण तो झाला नाही.कदाचित झाकली मूठ सव्वालाख डॉलर्सची असू शकते.

**– दत्तप्रसाद शिरोडकर, मुंबई**

दिनविशेष

# थोर संशोधक डॉ. शं. गो. तुळपुळे



शंकर गोपाळ तुळपुळे तथा डॉ. शं. गो. तुळपुळे हे मराठी भाषा आणि संत वाङ्मयाचे अभ्यासक, संशोधक आणि पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे माजी विभागप्रमुख होते. त्यांचा जन्म ५ फेब्रुवारी १९१४ रोजी पुण्यात झाला. त्यांचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण पुण्यात झाले. त्यांनी मुंबई विद्यापीठातून १९३८ मध्ये एम.ए. आणि १९४० मध्ये पीएच. डी. पदवी प्राप्त केली. पुणे विद्यापीठाची स्थापना झाल्यावर सुमारे २० वर्षे म्हणजे १९६९ पर्यंत ते मराठी भाषा-साहित्य विभागाचे प्राध्यापक आणि विभागप्रमुख होते.

विद्यापीठाच्या सुरुवातीच्या काळात विभागाला आणि मराठीच्या अभ्यासाला एक प्रकारची शिस्त लावण्याचा मोठा प्रयत्न त्यांनी केला. त्यांनी १९६० नंतर आपले संशोधनात्मक ग्रंथ लोकांसमोर आणले. त्यांमध्ये 'ॲन ओल्ड मराठी रीडर' (जे पाश्चात्यांना मराठी शिकण्यासाठी अधिक उपयुक्त होते) १९६०, 'लिंग्विस्टिक स्टडी ऑफ ओल्ड मराठी' १९७३, 'फाइव्ह पोएट सेंट्स ऑफ महाराष्ट्र' १९६२, 'मराठी शिलालेख' १९६३, 'महानुभाव संप्रदाय आणि साहित्य', 'रा.द.रानडे जीवन आणि तत्त्वज्ञान' १९६५, 'महाराष्ट्र सारस्वताची पुरवणी', अशी सुमारे २० ग्रंथांची नावे देता येतील.

'प्राचीन मराठी शब्दकोश' हा सुमारे आठशे पानांचा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे डॉक्टरांची मराठी भाषेला महत्त्वाची देणगी म्हणावी लागेल. डॉ. ॲनफेल्ड हौस (अरिझोना विद्यापीठ, अमेरिका) यांच्या सहाय्याने १९९९ साली मुंबईच्या पॉप्युलर प्रकाशनाने हा शब्दकोश प्रसिद्ध केला. अकराव्या शतकापासून तेराव्या शतकाच्या अखेरपर्यंतच्या मराठी संतांच्या रचनांतून येणाऱ्या शब्दांच्या व्युत्पत्ती, व्याकरण, अर्थ आणि उदाहरणे अशा प्रकारे सविस्तर माहिती देणारा हा शब्दकोश मराठीत आजही अद्वितीय आहे. डॉ. तुळपुळे हे मराठीच्या प्राचीन साहित्याचे सखोल अभ्यासक म्हणून ओळखले जातात. त्यांनी यादवकालीन मराठी भाषेचा भाषाशास्त्रीय अभ्यास या विषयावर डॉक्टरेट मिळवणाऱ्या तुळपुळेंनी पाच संतकवी, मराठी शिलालेख व महानुभाव साहित्य यांवर मौलिक संशोधन केले. सोलापूर येथील कुडलसंगम शिलालेखाच्या प्राचीनत्वाच्या पुराव्याला पुष्टी देऊन त्यांनी मराठी भाषेच्या इतिहासात मोलाची भर घातली. अशा या थोर संशोधकाचे ३० ऑगस्ट १९९४ रोजी निधन झाले.

## निवडक



### नेत्रचिकित्सा शिबिरास प्रतिसाद

**नागोठणे :** नागोठणे लायन्स क्लबचे चार्टर्ड प्रेसिडेंट लायन प्रकाश जैन यांचे दिवंगत भाऊ स्व. फुटरमल सरेमल जैन यांच्या स्मरणार्थ येथील शांतीनगर भागातील स्व. बाळासाहेब ठाकरे बालोद्यानमध्ये बुधवारी (दि.४) संपन्न झालेल्या मोफत नेत्रचिकित्सा व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात ४५ नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली होती. यापैकी मोतीबिंदू आढळलेल्या १२ रुग्णांवर शंकरा आय हॉस्पीटल येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. यावेळी लायन जयराम पवार यांनी फुटरमल जैन यांच्या आठवणींना उजाळा दिला. नागोठणे लायन्स क्लब आणि नवीन पनवेल येथील आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झालेल्या या शिबिराला प्रकाश जैन, सुधाकर जवके, यशवंत चित्रे, नागोठणे लायन्स क्लबचे अध्यक्ष सखाराम ताडकर, विशाल शिंदे, डॉ. अनिल गीते, विलास चौलकर, जयराम पवार, विजय शहासने, संतोष शहासने, दीपक गायकवाड, विनोद सावंत, सुजाता जवके, विद्या म्हात्रे, सिद्धेश काळे, दीपक लोणारी, दीपिका गायकवाड, शंकर आय हॉस्पिटलचे विजय बामणे, अविनाश पानग्रही, हर्षवी शिंदे, प्राजक्ता गायकवाड आदींसह नागोठणे शहर व परिसरातील नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### ‘वाळन’ कथासंग्रहाचे प्रकाशन

**रसायनी :** लेखक प्रवीण बोपुलकर यांच्या ‘वाळन’ या कथासंग्रहाचे प्रकाशन आंध्र कला समितीच्या साहित्यप्रेमींच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. राजेंद्र माने यांनी भूषविले. कथासंग्रहाचे प्रकाशन प्रा. प्रतिभा सराफ यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी रोहिदास पोटे तसेच संदीप राक्षे यांची विशेष उपस्थिती लाभली. ‘वाळन’ या कथासंग्रहामध्ये ग्रामीण व शहरी जीवनातील वास्तव, माणसांच्या भावना, संघर्ष, नातेसंबंध आणि सामाजिक जाणिवांचे प्रभावी चित्रण करण्यात आले आहे. लेखकाची साधी, प्रांजळ भाषा आणि आशयघन कथनशैली वाचकांच्या मनाला स्पर्श करते, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमात लेखक प्रवीण ज. बोपुलकर यांनी आपल्या लेखनप्रवासाबद्दल मनोगत व्यक्त केले. या कथासंग्रहाचे प्रकाशन सर्जनशील पब्लिकेशन मार्फत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी अतकरे यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. याप्रसंगी निमंत्रितांच्या कविसंमेलनाचे अध्यक्षपद ज्योत्स्ना राजपूत यांनी भूषवले. महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यातून उपस्थित असलेल्या कवींनी कवी संमेलन अधिक उंचीवर नेले.सह सचिव रामदास गायधने, रायगड महिला संघटन प्रमुख माधवी मोतलिंग व केंद्रीय प्रसिद्धी प्रमुख विलास पुंडले यांच्या संयोजनातून प्रकाशन सोहळा उत्साही वातावरणात यशस्वीपणे पार पडला.

### मोबाईलचा अक्सेस घेऊन फसवणूक

नवीन पनवेल : मोबाईलचा अक्सेस घेऊन आयफोन खरेदी केला आणि मोबाईलचे ८२ हजार ९३३ रुपये क्रेडिट कार्डमधून भरून फसवणूक केल्या प्रकरणी अज्ञात इसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात ३० जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. वैभव सावंत हा चांभार्ली, मोहोपाडा येथे राहत असून त्याच्या मोबाईलमध्ये फ्लिपकार्ट अकाऊंट आहे. २९ जानेवारी रोजी व्हाट्सअपवर एपीके फाईल आली. आरटीओ संदर्भातील फाईल असल्याने ती डाऊनलोड केली. त्यानंतर संध्याकाळी क्रेडिटकार्डमधून २३८ रुपये डेबिट झाल्याचे दिसून आले. आणि पुन्हा क्रेडिटकार्डमधून ८२ हजार ९३३ रुपये डेबिट झाल्याचे समजले. यावेळी मोबाईलचा एक्सेस घेऊन सायबर फ्रॉड झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी कस्टमर केअरला फोन करून क्रेडिटकार्ड ब्लॉक केले. फ्लिपकार्ट अकाऊंट ओपन केले असता तीन टॅक्स इन्व्हाईस बिल प्राप्त झाले. अनोळखी इसमाने त्यांच्या मोबाईलचा एक्सेस घेऊन फ्लिपकार्ट अकाऊंटवरून आयफोन खरेदी केला आणि त्याचे बील क्रेडिटकार्डमधून भरून फसवणूक केली.

### स्कुटीवरून पडून मृत्यू

**नवीन पनवेल :** स्कुटीवरून पडून मंगेश शंकर कांबळे (राहणार रेना इन्सल्स बिल्डिंग, तक्का) यांचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली. ३० जानेवारी रोजी स्कुटी क्रमांक एम एच ४६ बीवाय २९९० वरील चालक हा सावता माळी रोड पनवेल, तक्का या ठिकाणी बेशुद्ध अवस्थेत पडला असल्याची माहिती पनवेल पोलिसांना मिळाली. त्यांना उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल करण्यात आले. यावेळी डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- We are inviting for internship to graduate candidates for share market trading.Stipend will be paid. For interview call 9923750549
- फर्निचर पॅकींगसाठी मुले पाहिजेत. शिक्षणाची अट नाही. ठिकाण– बामणसुरे, चोंढी, पगार– १२००० महिना, संपर्क : ९८२३५८५३२१
- कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- गावरान कोंबडीची (सोनाली) पिल्ले मिळतील. मु.पो.आक्षी, अलिबाग, संपर्क : ९२७०५९०६२३
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. रेस्टॉरंट मॅनेजर,रिसेप्शनिस्ट,कॉन्टिनेंटल,मेन्टेनन्स,वेटर, हाऊसकिपींग, रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९१८४६१२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# नदीकाठावर एक्सपायरी औषधांचा ढिगारा

- लहान मुलांच्या जीवाला धोका,
- प्रशासनाच्या निष्क्रियतेवर नागरिकांचा संताप

| चणेरा | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील उडवणे परिसरात अनेक गावांना जोडणाऱ्या मुख्य रस्त्यालगत नदीच्याकडेला मोठ्या प्रमाणावर एक्सपायर झालेली औषधे उघड्यावर फेकून दिल्याचा अत्यंत गंभीर व धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या ठिकाणी सिरपच्या बाटल्या, गोळ्यांचे मोठमोठे पाकिटे, विविध औषधांचे बॉक्स तसेच वैद्यकीय कचऱ्याचा मोठा ढिगारा आढळून आला असून काही औषधांची विल्हेवाट लावण्याच्या नावाखाली जागेवरच जाळपोळ करण्यात आली आहे. यामुळे अर्धवट जळालेला औषधांचा कचरा परिसरात विखुरलेला दिसून येत आहे.



प्रत्यक्ष पाहणी दरम्यान अनेक औषधांच्या पॅकिंगवर बालरुग्णांसाठी वापरली जाणारी औषधे असल्याचे स्पष्टपणे दिसून आले आहे. लहान मुलांसाठी असलेली ही औषधे उघड्यावर फेकण्यात आल्याने संभाव्य धोका अधिकच गंभीर ठरत आहे. विशेष म्हणजे औषधांच्या या ढिगाऱ्याच्या अगदी जवळच लहान मुलांची शाळा असून या रस्त्यावरून रोज शाळकरी विद्यार्थी, शेतकरी, कामगार व नागरिकांची मोठ्या प्रमाणावर ये-जा सुरू असते. हा रस्ता मुख्य असल्याने तसेच रस्त्यालगत मोठी वस्ती असल्यामुळे कधीही अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. नदीच्या पलीकडे उडवणे गावासह इतर परिसर जोडलेले असल्याने या प्रदूषणाचा फटका मोठ्या लोकसंख्येला बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

संपूर्ण प्रकरणात संबंधित औषध विक्रेते, वैद्यकीय संस्था किंवा कचरा विल्हेवाट लावणाऱ्या यंत्रणांची चौकशी होणे अत्यावश्यक असल्याची मागणी नागरिक करत आहेत. अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच स्थानिक प्रशासन यांनी तात्काळ दखल घेऊन दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांकडून देण्यात येत आहे.

**पाणी प्रदूषित**

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार औषधांमधील घातक रासायनिक घटक नदीत मिसळून पाणी प्रदूषित होत आहे, तर जाळलेल्या औषधांचा धूर मानवी आरोग्यास अत्यंत अपायकारक आहे. नियमांनुसार एक्सपायर औषधांची सुरक्षित व शास्त्रशुद्ध पद्धतीने विल्हेवाट लावणे बंधनकारक असताना उघड्यावर औषधे टाकणे व जाळणे हा कायद्याचा गंभीर भंग आहे.

# विद्यार्थ्यांनी लुटला बाल बाजाराचा आनंद

| उरण | प्रतिनिधी |

रोजी पीएम श्री रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुळेखंड शाळेमध्ये मंगळवारी (दि.३ ) रोजी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्यामध्ये दैनंदिन व्यावहारिक ज्ञान, कौशल्य खरेदी-विक्री, नफा-तोटा, स्वनिर्मितीचा आनंद, नियोजन, कृती, विविध वस्तूंची माहिती, टापटीपपणा, स्वच्छता, व्यावहारिक भाषा, संवाद कौशल्यावर आधारित असा इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी आठवडे आनंदी बाल बाजाराचा आयोजन करण्यात आले होते.



उपक्रमांतर्गत एकूण विविध प्रकारचे ३० स्टॉल लावण्यात आले होते. त्यामध्ये विविध प्रकारचे भजी, वडापाव, मोमोज लिंबू सरबत, भाजी स्टॉल, फ्रुट स्टॉल हे आजच्या खरेदीचे विशेष आकर्षण ठरले. आजच्या या बाल बाजाराला भेट देण्यासाठी अजय म्हात्रे, जगदीश म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांकडून खरेदी केली. कल्याण कोळी, रत्नाकर पाटील, मनीषा म्हात्रे, दर्शना म्हात्रे, रंजिता, अस्मिता म्हात्रे, पंचायत समिती उरणच्या तायडे, नित्यानंद भोईर, वंदना पाटील, सविता पाटील, अनिता सावळे, गावातील महिला पालक प्रतिनिधी विद्यार्थी उपस्थित होते. या बाल बाजारामध्ये ना-नफा, ना-तोटा या तत्त्वावर पंधरा हजार रुपयाची उलाढाल झाली. या उपक्रमाला गटशिक्षणाधिकारी निर्मला घरत, शंकर म्हात्रे यांनी शुभेच्छा दिल्या. बाल बाजाराचे नियोजन अमृत ठाकूर, विद्या वाणी, संजय होळकर, अर्चना पाटील, पूजा म्हात्रे, वर्षा कडू, दुर्गा भालेराव, तन्वी ठाकूर यांनी मेहनत घेतली.

# अपघातात तरुणाचा मृत्यू

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

स्पोर्ट्स बाईक भरधाव वेगाने चालवून रस्त्याच्या डिव्हायडरला क्रॉस करून विरुद्ध लेनवर आली आणि व्हॅगन आर कार तसेच ह्युंदाई आय टेन कारला धडकून चिन्मय सुनील मसाळ (राहणार घणसोली) याचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली.

एक फेब्रुवारी रोजी पळस्पे फाटा ते गव्हाण फाट्याकडे जाणाऱ्या लेनवरून साई वर्ल्ड येथील ब्रिजवरून स्पोर्ट्स बाईक क्रमांक एम एच ४३ सीजे १४९७ ही डिव्हायडर क्रॉस करून व्हॅगनार कार क्रमांक एम एच ४७ ए ०९८४ या कारला धडक दिली. या धडकेत कारचे नुकसान झाले. त्यानंतर ती बाईक पाठीमागून आलेल्या ह्यूदाई आय टेन कार क्रमांक एम एच ४६ सीएफ १९५८ हिला देखील धडकली.

या अपघातात दोन्ही कारचे नुकसान झाले तर स्पोर्ट्स बाईक चालक चिन्मय सुनील मसाळ हा जखमी झाला. त्याला एमजीएम रुग्णालय कामोठे येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.



### वाजेकर कॉलेज कॅम्पसतर्फे ताडपत्री भेट


| चिरनेर | प्रतिनिधी |

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालयाच्या लायन्स क्लब वीर वाजेकर कॅम्पसच्या विद्यार्थ्यांनी तु. ह. वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे येथील विद्यार्थ्यांसाठी सुमारे ३६०० स्क्वेअर फुटच्या चार ताडपत्री भेट देण्यात आल्या. शालेय विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम सातत्याने राबविण्यात येतात. विद्यार्थ्यांना खाली जमिनीवर बसावे लागत होते. विद्यार्थ्यांची ही गैरसोय बघून महाविद्यालयाच्या लाईन्स क्लबने चार मोठ्या ताडपत्र्या शाळेस भेट दिल्या आहेत. याप्रसंगी शाळेचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य बबन साळुंखे, उपप्राचार्य थोरात, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, गार्गी ठक्कर, डॉ पालवे, गजानन चव्हाण, प्रा. राम गोसावी, शाळेचे पाटोळे, किशोर पाटील देवरे, खेडकर धुरी, व लाईन्स क्लबचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हरित लवाद घोड्यांच्या संख्येबाबत घेणार निर्णय

| माथेरान | प्रतिनिधी |

माथेरानमधील घोड्यांच्या संख्येवर आळा असावा याकरिता सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे यांनी हरित लवादकडे तक्रार दाखल केली होती. त्याची सुनावणी ३० जानेवारीला पार पडली. ज्यामध्ये हरित लवादाने घोडे संघटनेच्या वकिलांनी आक्षेप सादर केल्याने सुनावणीसाठी दोन आठवड्याचा अवधी दिला आहे.



पुणे येथील राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या पश्चिम विभागीय खंडपीठाने अधिसूचित पर्यावरण-संवेदनशील क्षेत्र आणि वाहनमुक्त थंड हवेचे ठिकाण असलेल्या माथेरानमधील गंभीर पर्यावरणीय समस्यांची दखल घेतली. खंडपीठाने सुनील शिंदे आणि अन्य एका अर्जदाराने महाराष्ट्र राज्य आणि इतर प्राधिकरणांविरुद्ध दाखल केलेल्या मूळ अर्जावर विचार केला.

न्यायाधिकरणाने नमूद केले की, सुनावणीच्या दिवशी एक संयुक्त समितीचा अहवाल रेकॉर्डवर ठेवण्यात आला होता. त्याच्या प्रती प्रतिवाद्यांना देण्यात आल्या होत्या.

घोडे मालकांच्या संघटनांच्या वतीने हजर असलेल्या वकिलांनी उत्तर देण्यासाठी वेळ मागितला, कारण अहवाल त्यांना केवळ एक दिवस आधीच मिळाल्याचे त्यांनी सांगितले. खंडपीठाने आक्षेप दाखल करण्यासाठी दोन आठवड्यांची मुदत दिली.

माथेरान हिल स्टेशन नगर परिषदेच्या प्रतिनिधींच्या अनुपस्थितीबद्दलही न्यायाधिकरणाने चिंता व्यक्त केली. योग्य नोटीस बजावूनही, त्यांच्या वतीने कोणीही हजर राहिले नाही. खंडपीठाने नगर परिषदेला एक आवश्यक पक्ष मानले आणि निबंधकांना मुख्य अधिकाऱ्यांना पत्र लिहिण्याचे निर्देश दिले. आदेशात हे स्पष्ट करण्यात आले की, पुढील तारखेला हजर न राहिल्यास संबंधित अधिकाऱ्याला वैयक्तिकरित्या हजर राहण्याचे निर्देश दिले जाऊ शकतात.

# राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानाची सांगता

| पनवेल | प्रतिनिधी |

दिवसेंदिवस वाढती अपघात संख्या यास कुठे तरी आळा बसावा, या उद्देशाने केंद्रीय शासनातर्फे दरवर्षी राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येतो. त्याची अंमलबजावणी शासन स्तरावर करण्यात येते विशेषतः पोलीस विभाग व प्रादेशिक परिवहन विभाग यांच्या मार्फत विविध उपक्रम राबऊन अंमलबजावणी करण्यात येते. याच उद्देशाने पनवेल आरटीओतर्फे विविध शाळांमधील आरएसपीच्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून राबविले विविध उपक्रम पनवेल प्रादेशिक परिवहन विभाग पनवेल मार्फत प्रादेशिक परिवहन विभागाचे प्रमुख प्रादेशिक परिवहन



विभागाचे प्रमुख प्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत चव्हाण यांच्या नेतृत्वात रोहित कोलप, अशोक वारे, प्रा. राजेंद्र पालवे, विलास पाटील यांच्या सहकार्याने कळंबोली येथील सुधागड हायस्कूल कळंबोली येथे १ ते ३१ जानेवारी दरम्यान राबविण्यात आले. अभियानात विविध शाळांमधील विविध आरएसपीच्या विद्यार्थ्यांनी विविध उपक्रम व स्पर्धा आयोजित करून सदर अभियानाची अंमलबजावणी करण्यात आली. सदर रॅलीच्या माध्यमातून वाहतूक सुरक्षेविषयी विद्यार्थ्यांनी घोषणा देत हाती घोषवाक्य फलक, पथनाट्य सादर करण्यात आले

सुधागड हायस्कूल कळंबोली येथे विविध शाळांमधील विद्यार्थ्यांच्या चित्रकला, निबंध, तसेच वक्तृत्व स्पर्धा आयोजन करून सहभागी सर्व विद्यार्थ्या प्रशस्तीपत्रक व बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.

तसेच आपत्ती व्यवस्थापन विषयक विद्यार्थ्यांचे एक दिवशीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजित करून याविषयी विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक घेऊन अंमलबजावणी करण्यात आली.

१ जानेवारीपासून सुरू झालेल्या ३७ व्या रस्ता सुरक्षा अभियानाची सांगता ३१ जानेवारी रोजी सांगता करण्यात आली. अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी पृथ्वीराज काकडे यांनी नियोजन केले व त्याची अंमलबजावणी सुधागड हायस्कूलचे प्राचार्य राजेंद्र पालवे, विलास पाटील यांनी केले. त्यांना पुनम कांबळे, खेडकर, एल. व्हि पाटील, विकास नाईक यांनी सहकार्य केले.

# तळा-इंदापूर तळा शटल सेवा सुरू करण्याची मागणी

| तळा | प्रतिनिधी |

तळा इंदापूर एसटी शटल सेवा सुरू करण्याची मागणी प्रवासी वर्गाकडून केली जात आहे.तळा इंदापूर एसटीची शटल सेवा सुरू करण्यात आल्यापासून तिला प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद देखील मिळाला मात्र गेल्या आठवडाभरापासून ही शटल सेवा बंद करण्यात आल्याने याचा नाहक त्रास प्रवासी वर्गाला सहन करावा लागत आहे. तालुक्यातील अनेक प्रवासी इंदापूर, माणगावला आपल्या कामांसाठी जात येत असतात. तळा तालुका हा डोंगराळ दुर्गम तालूका असून एसटी हे एकमेव दळणवळणाचे साधन आहे.

तालुका ठिकाणी अनेक जण शासकीय कामासाठी शहराकडून येत असतात शटल सेवा सुरू असताना या सर्वांना प्रवास करणे सोयीस्कर पडत होते. मात्र ही सेवा बंद झाल्याने तसेच वेळेवर इंदापूर साठी एस टी नसल्याने या सर्वांना आपल्या इच्छित स्थळी पोहचण्यासाठी खासगी वाहनांना जास्तीचे पैसे मोजावे लागत आहेत. वेळ व आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. तरी रायगड विभाग नियंत्रक पेण यांनी यामध्ये त्वरित लक्ष घालून प्रवाश्यांची होणारी गैरसोय दूर करावी व पूर्वी प्रमाणे चालू असलेली तळा इंदापूर एसटी शटल सेवा सुरू करावी अशी मागणी प्रवासींवर्गाकडून केली जात आहे.

**बाह्यवळण मार्गाला मिळेना मुहूर्त | अपघातांच्या प्रमाणात झाली वाढ**

# पालीत वाहतूक कोंडीची समस्या बिकट

| पाली | प्रतिनिधी |

पाली शहरात वाहतूक कोंडीची समस्या अत्यंत बिकट झाली आहे. मागील अनेक वर्षांपासून रखडलेला बाह्यवळण मार्ग (बायपास) अद्याप पूर्ण न झाल्याने भाविक, पर्यटक, प्रवासी आणि स्थानिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. अरुंद रस्त्यातून अवजड वाहने काढताना चालकांची मोठी कसरत होत असून, कोंडीमुळे शहराचा श्वास गुदमरत आहे.



पाली हे तालुक्याचे ठिकाण असल्याने येथे नेहमीच वर्दळ असते. बल्लाळेश्वर मंदिर परिसर, वडेर हायस्कूल, जुने एसटी स्टॅण्ड, गांधी चौक आणि बाजारपेठ यांसारख्या अरुंद रस्त्यांवर नियमित कोंडी होते. डबर व खडी वाहतूक करणारे अवजड डंपर, नियमांचे उल्लंघन करून होणारी दुहेरी वाहतूक आणि रस्त्याच्या दुतर्फा असलेली अवैध पार्किंगमुळे ही समस्या अधिकच जटील झाली आहे. अनेकदा महत्वाच्या वाहतूक पोलीस तैनात नसल्याने कोंडीत भर पडते, ज्याचा फटका रुग्णवाहिकांनाही बसत आहे. काही दिवसांपूर्वीच वाहतूक कोंडीत अडकलेले असताना एका डंपरमुळे ग्रामविकास अधिकाऱ्याला गंभीर दुखापत झाल्याची घटनाही घडली आहे.

**वाहतुकीचा ताण**

मुंबई-गोवा महामार्गावरील कोंडी व संथ गतीने सुरू असलेले कामामुळे मुंबईकडून कोकणात जाणारी आणि कोकणातून पुण्या-मुंबईकडे येणारी बहुतांश वाहतूक पालीमार्गे वळवली जाते. यामुळे तीर्थक्षेत्रातील मुळ वाहतुकीत बाहेरच्या वाहनांची मोठी भर पडत आहे. बाह्यवळण मार्ग झाल्यास ही वाहने तसेच अवजड वाहने शहराबाहेरून जातील आणि पालीचा रस्ता मोकळा होईल.

**१५ वर्षांपासूनचा वनवास**

पालीतील बाह्यवळण मार्गाला मंजुरी मिळून १५ वर्षे उलटली आहेत. यासाठी १८ कोटी रुपये रस्त्यासाठी आणि १० कोटी रुपये भूसंपादनासाठी मंजूर आहेत. मात्र, तांत्रिक अडचणींमुळे आणि जमिनीचा मोबदला योग्य न मिळाल्याने शेतकऱ्यांचा विरोध असल्याने हे काम अद्याप कागदावरच आहे.

> **“पालीत अरुंद रस्ते, अतिक्रमणे, दुतर्फा पार्क केलेली वाहने व नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालक, सतत होणारी अवजड वाहतूकीमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होताना दिसत आहे. पोलिसांनी योग्य प्रकारे वाहतुकीचे नियोजन करणे आवश्यक आहे. शिवाय बाह्यवळण मार्ग झाल्यास वाहने थेट शहरा बाहेरून जातील आणि वाहतूक कोंडीचा प्रश्न आपोआप मार्गी लागेल.**
> **– कपिल पाटील, सामाजिक कार्यकर्ते, पाली”**

## जाहीर नोटीस

दि.०५/०२/२०२६

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे - खरवंडी, तालुका - कर्जत, जि - रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| १) तेजश्री वैभव थोरात<br>२) प्रतीक सदानंद शेट्टी | ११ | ० | ०.४८.००<br>यापैकी दिलेले क्षेत्र<br>०.२४.०० | १.२७ |

सदरची जमिन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्जलिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासुन १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत

दि.०५/०२/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड.उत्कर्षा सुरेश सोनावळे**
पत्ता : श्रीसाई सावली अपार्टमेंट, दुसरा मजला, दिवाणी न्यायालया समोर, विठ्ठल नगर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९०७५९९५९२८

## PUBLIC NOTICE

**NOTICE IS HEREBY GIVEN TO THE PUBLIC AT LARGE THAT** we are investigating the title of Mr. Jaydeep Vinod Mehta and Mr. Nikhil Vinod Mehta with respect to the following property:-

Agricultural land situated at Village Vindhane (Navpada), within the limits of Vindhane Gram Panchayat and Uran Panchayat Samiti, Taluka Uran, District Raigad, described in Schedule below (hereinafter referred to as "the said Property"). If any person has any right, title, interest, claim, share, possession, tenancy, earnest money receipt, promissory note, agreement for sale, sale deed, mortgage, lien, maintenance, charge, lease, gift, attachment, loan, trust, inheritance, or any other legal claim of any nature whatsoever on the said Property, they should lodge their objections in writing along with legal proofs to the undersigned Advocate within 14 days from the date of publication of this notice.

If no objections are received within the stipulated time, it will be presumed that the said Property is clear and free from encumbrances, and that no one has any legal rights or interests therein, or if any exist, they have been knowingly waived. Any objection raised thereafter or published elsewhere in newspapers shall not be binding.

**SCHEDULE OF PROPERTY**

Description of Property: Agricultural land situated at Village Vindhane (Navpada), within the limits of Vindhane Gram Panchayat and Uran Panchayat Samiti, Taluka Uran, District Raigad, described as follows:

| Sr. | Survey No./ Hissa No. (New Navpada) | Survey No./ Hissa No. (Old Vindhane) | Area (Hectare-Are) |
|---|---|---|---|
| 1 | 2/1/A | 12/1/A | 1.10.70 |
| 2 | 2/2 | 12/2 | 0.9.00 |
| 3 | 2/3/B | 12/3/B | 0.20.00 |
| 4 | 3/1/1 | 10/1/1 | 0.61.70 |
| 5 | 2/3/A | 12/3/A | 0.41.00 |
| 6 | 2/7 | 12/7 | 0.03.00 |
| 7 | 3/1/3 | 10/1/3 | 0.28.20 |
| 8 | 3/2 | 10/2 | 0.03.00 |
| 9 | 3/3 | 10/3 | 0.07.60 |
| 10 | 3/4 | 10/4 | 0.09.40 |
| 11 | 3/5 | 10/5 | 0.12.40 |
| 12 | 4/2 | 8/2 | 0.04.30 |

Date: 05/02/2026
Place: Panvel / Uran

**Adv. Datta N. Mudiganti**
"Sarita" Plot 04, Road 10, Sector 12,
New Panvel (E), Navi Mumbai- 410206.
Mob: 9869457395/8655550500

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे कळवण्यात येते की, आमचे आशिल १) किशोर पुंडलिक पाटील २) सुरेश पुंडलिक पाटील रा. शेडुंग, पो. आजिवली, ता.पनवेल, जि.रायगड यांनी खालील वर्णनाची नमूद केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक १) बशीर गनीभाई वाडिया २) शोऐब बशीर वाडिया यांचेकडून कायम विकत घेण्याचे ठरविले असून त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-तांबस, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| भूमापन क्र. | उपविभाग क्र. | एकूण क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार रु./पै. |
|---|---|---|---|
| ३७ | १ | एकुण ०-५३-२० गुंठे क्षेत्रापैकी खरेदी देणार यांचे मालकीची<br>क्षेत्र ०-१५-२२<br>पो.ख ०-१-७८<br>एकुण ०-१७-० | ०.२६ |

या मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हाला ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसात लेखी पुराव्यासह कळवावे, वरील मुदतीत कोणत्याही प्रमाणे हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे आशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : ०५/०२/२०२६

अधिवक्ता
**ॲड. सौ. शुभांगी आनंद साळवी**
पत्ता-सरमोकादम बंगलो, गाळा नं २
दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१
मो.नं. ९९६७८३४६१८/७७९६२०७३८०.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे कोठींबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकती आमचे अशिलांनी तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कोठींबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| श्रावणी सचिन मनोरे | ९५ | २ | ०-०४-३० | ०.३५ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकतीची निर्वेध बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीची खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : ०५/०२/२०२६

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्यु को.ऑप.हौ.सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर,
कर्जत रायगड
मो.: ९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

**ॲड. राजेंद्र पी. निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर,
कर्जत रायगड
मो. : ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक शकुंतला चिंतामण म्हात्रे, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (आर.चौ.मी.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| चेंढरे ता.अलिबाग | ३६/१/२/९ | १-५५-०० | १५.५० |

वर नमुद बिननशेती जमिन व त्यामधील ग्रामपंचायत चेंढरे हद्दीतील मिळकत क्र. १६५२/१, व मिळकत क्र. १६५२/२ या मिळकतीबाबतचे.

दिनांक : ०५/०२/२०२६

अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ताः फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की, मौजे बांधीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती जमिनीची मिळकत व त्यामध्ये बंगलो मिळकत आहे त्या मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार श्री.स्टॅनी सिप्रीयन कारडोझा यांचेकडुन आमचे अशिल श्री.निलमणी नरहरी दास यांनी कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्ड प्रमाणे वर्णन खालीलप्रमाणे...

**मौजे बांधीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिनीची मिळकती**

| गावाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | बंगलो नं./ क्षेत्रफळ |
|---|---|---|
| बांधीवली | सर्व्हे नं. १३४ हिस्सा नं.२ | (चौ. मीटर / चौ. फुट )<br>(सर्व्हे नं.१३४ हिस्सा नं.२, क्षेत्र २५०.९२ चौ. मीटर यावरील बंगलो नं. २२ क्षेत्र ६६५ चौ.फुट बिल्टअप) |

तदंगभुत सर्व हक्कहितसंबंध सुद्धा कायम विकत घेणेचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतीवावत इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, मृत्युपत्रांकीत दान, साठेकरार, ताबाकब्जा, वहिवाट, पोटगी, लीन, चार्ज, भाडेपट्टा, जाणेयेणेचे मार्ग, वारसाहक्क वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यांसह लेखी हरकती रजिस्टर्ड पोप्टाने पाठवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहित असल्याचे आमचे अशिल समजतील. तसेच कोणाचीही हरकत असल्यास ती त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिली आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील.
मुदतीनंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत ता.
पत्ता : शेलु, ता.कर्जत, जि.रायगड.
मो.नं.९९२१०२३१४३

**ॲड. अश्विन नारायण मसणे**
खरेदीदारतर्फे ॲडव्होकेट

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील नमूद मिळकतींमध्ये आमचे अशिलांचा व त्यांचे मुलांचा अविभक्त सामाईक हिस्सा आहे. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे:

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कोपर, ता.अलिबाग, जि. रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पैसे |
|---|---|---|
| ११९ | ०.०२.०० | ०.०५ |
| ११ | ०.०६.७०<br>पो.ख. ०.०१.१०<br>एकूण ०.०७.८० | १.४८ |

**मौजे चरी, ता.अलिबाग, जि. रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पैसे |
|---|---|---|
| ११५ | ०.०४.६०<br>पो.ख. ०.००.४०<br>एकूण ०.०५.०० | ०.६४ |

वर नमूद मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा व त्यांचे मुलांचा अविभक्त सामाईक हिस्सा आहे. असे असताना सदर मिळकतीतील सहहिस्सेदार या मिळकतींचा विक्री व्यवहार करण्याच्या तयारीत असल्याचे आमचे अशिलांस समजले असून, या व्यवहारांस आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. तरी या नोटीसीने सर्वांस कळविण्यात येते की, कोणीही वर नमूद मिळकतींसंदर्भात खरेदी-विक्री अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. अशाप्रकारच्या सर्व व्यवहारांस आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. याउपरही कोणीही या मिळकतीसंदर्भात कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**ॲड. महेश भरत ठाकूर,**
जिल्हा न्यायालय-अलिबाग
मोबा. ९२७०२४२५८७

अशिलांची सही

## जाहीर सुचना

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल मेसर्स ओम पंचरत्न (भागीदारी संस्था) हे बिनशेती वर्णनाचे गट/सर्व्हे नं. २८९, चे एकुण क्षेत्रफळ व्हे. ४६आर. १प्रति, पैकी मुंबई-पुणे महामार्गाकरिता संपादित क्षेत्र ०हे. ०१आर. ५प्रति वगळून उर्वरित ०हे. ४४ आर. ६०प्रति क्षेत्रफळ ४४६० चौ.मी. आणि त्यावरील बांधलेली संपूर्ण हॉटेलची मिळकत, मौजे कलोते मोकाशी, ता. खालापुर, जि.रायगड महाराष्ट्र चे मालक आहेत.

परंतु उपरोक्त बिनशेती मिळकतीचे मुळ शीर्षक दस्तऐवज जसे की, (१) जिल्हाधिकारी एनए परवानगी आदेशाची मूळ प्रत दिनांक १७/०९/१९९४ (२) रस्त्याच्याकडेला असलेल्या उपहारगृह/हॉटेलसाठी मुख्य अभियंता (पीडब्ल्यू) यांची रेस्टॉरंट परवानगी दिनांक ०९/०६/१९९५(३) अलिबाग येथील नगररचना आणि जमीन करनिर्धारण विभागाच्या सहाय्यक/कार्यकारी परवानगी यांनी दिनांक १५/१०/२००९ रोजी जारी केलेल्या हॉटेल रचना परवानगी आणि जमिनीच्या लेआउटसह मंजूर आराखडा अशा प्रकारची मुळ कागदपत्रे त्यांच्या पनवेल येथील कार्यालयातुन येथून गहाळ झाली आहेत, त्याची तपासणी करून सुद्धा सदरची कागदपत्रे सर्वतोपरीने मिळणे अशक्य झाले. म्हणून सदर बाबतची खबर सभासदांनी संबंधित अधिकार क्षेत्रातील पनवेल, जि. रायगड पोलीस स्टेशनमध्ये दिनांक ०३/०२/२०२६ रोजी दाखल केलेले असुन त्याचा गहाळ नोंदणी क्रमांक -०२४५/२०२६ असा आहे. सदरची बिनशेती मिळकत आणि त्या मिळकतीवरील बांधलेले हॉटेल/रेस्टॉरंट शीर्षकाची पुष्टी करण्यासाठी आमच्या अशिलांनी नोटीस जारी केली आहे की सदरची मुळ कागदपत्रे कोणत्याही व्यक्तीला सापडली तर ते सदरची जाहिर सुचना वर्तमानपत्रामध्ये छापून आल्यानंतर पंधरा (१५) दिवसांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर व दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून त्याची माहिती द्यावी अन्यथा आमचे अशिल हे सदरच्या बिनशेती मिळकत आणि त्या मिळकतीवरील बांधलेले हॉटेल/रेस्टॉरंटच्या संदर्भात कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत नाही असे गृहित धरतील याची नोंद घ्यावी आणि आमच्या अशिलांनी सदरची मिळकत आणि त्या मिळकतीवरील बांधलेले हॉटेल/रेस्टॉरंट हे कायमस्वरुपी विक्री, हस्तांतरित करण्याचे ठरविले आहे. सदरची बिनशेती मिळकत आणि त्या मिळकतीवरील बांधलेले हॉटेल/रेस्टॉरंट आणि सर्व बोजा, शुल्क व दाव्यापासून मुक्त आहे आणि त्यानंतर सर्व तीव्रतेचे दावे माफ केले गेले आहेत.

कळावे,

सही : **अजीत सिंह ॲण्ड असोसिएटस्**
(वकील व कायदेशीर सल्लागार)
पत्ताः ११६/११७, १ मजला, साई चेंबर,
प्लॉट नं.४४, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे,
दुरध्वनी क्रमांकः- ०२२-४००२६१४२
E-Mail ID-ajeet_advocate@yahoo.co.in

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे अंबेपूर ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णनाची सामाईक जिरायत जमिन मिळकत ही कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून व त्या अशियाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार श्री.सुरेश केशव पाटील, प्रभाकर केशव पाटील, मधुकर केशव पाटील आणि दत्ताराम केशव पाटील व माझे अशिलांच्या दरम्यान झालेली आहे.

संदर्भित मिळकत ही पूर्णतः निर्वेध, बोजाविरहीत व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालक व कब्जेदार यांनी माझ्या अशिलांना दिला आहे. या उपरही सदर मिळकतीत अन्य कोणाच्याही, कसल्याही तऱ्हेचे हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास तसेच गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, वहिवाटहक्क, फरोक्तखत असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ दिवसाच्या कालावधीत लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी माझी खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल निम्नलिखीत मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**-:मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भूमापन क्र. | उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|---|
| अंबेपूर ता.अलिबाग जि.रायगड | ७७ | २ | ०-२६-३०<br>०-०३-८० पो.ख<br>०-३०-१० | ३.०० |

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०५.०२.२०२६

**ॲड.सुधाकर पी.प्रभु**
'साईलिला' सी.एच.एस.,
'ए विंग' रूम नं.१०३, चेंढरे
ता.अलिबाग जि.रायगड
मोबाईल नं. ९८२२७९६८३०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे हाशिवरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनांच्या मिळकती मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| हाशिवरे ता.अलिबाग | ४५/१/अ | जिरायत १-४८-९०<br>पो.ख.०-०१-८०<br>एकुण १-५०-७० | ९.२० |
| | ४५/१/ब | जिरायत ०-६८-९०<br>पो.ख.०-०५-१०<br>एकुण ०-७४-०० | ५.६२ |

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेल्या मिळकती या विद्यमान मालक अंशुल अनिल अग्रवाल, यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक - ०४/०२/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
लक्ष्मी नारायण, १ ला मजला,
शॉप नं.७ व ८, ब्राम्हण आळी,
राम मंदिर समोर, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

## PUBLIC NOTICE

Through this public notice, the general public is hereby informed that our client. Ms. Ranjana G. Patil, residing at Pen Taluka- Pen, District-Raigad, has decided to permanently purchase the property described below located at Pen from the owner - legal heir of N. K. Patil

Description of the Property

Property Survey No. 9 (Old Survey No. 10 A 2/3, Plot No. 15) within the limits of the Pen Municipal Council. Total area of 243 sq meter.

Therefore, if any person/persons or financial institutions have and kind of claim, objection, or rights regarding the said area-such as a charge, gift, mortgage, government or semi-government company claim, gift deed, lease, inheritance rights, loan, or any other rights--they should meet in person at the address given below with supporting documents within 7 days from the publication of this notice.

Please note that any objections received after the expiry of this period will not be entertained.

Notice issued as above
Place: Pen
Date: 4/2/2026
Contact No: 7276222694

Sd/-
**Adv. Pratiksha Rajendra Parbalkar**
ADVOCATE, BLS.LLB.LLM
Office No.05, Shruti Sarang Apartment,
Opp. Union Bank, Bramhan Ali,
Tal. Albag, Dist. Raigad, Maharashtra

## सार्वजनिक सूचना

ही सूचना सर्वसामान्य जनतेला कळविण्यात येते की आमच्या क्लायंटनी नमूद जमीन मिळकतीचे मालक श्री. रघुनाथ दामोदर देशमुख, श्री.विलास शामसुंदर देशमुख व इतर आणि श्री. नरेश बळीराम देशमुख व इतर, यांच्याकडून खालील मिळकती खरेदी करण्यास सहमती दर्शविली आहे.

**सदर मालमत्तेचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:**

**मौजे तिवरे, तालुका- सुधागड, जिल्हा- रायगड,**

१.

| अनु. क्र. | गट/ उपगट | वर्ग | क्षेत्रफळ (हे आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) | जमीन मिळकतीचे मालक |
|---|---|---|---|---|---|
| १. | २७/१ | १ | ०-५४-२० | ४.५० | श्री.रघुनाथ दामोदर देशमुख |

२.

| अनु. क्र. | गट/ उपगट | वर्ग | क्षेत्रफळ (हे आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) | जमीन मिळकतीचे मालक |
|---|---|---|---|---|---|
| १. | १४ | १ | १-७५-०० | २२.१२ | श्री.विलास शामसुंदर देशमुख व इतर |
| २. | ९/६ | १ | ०-४२-०० | ०.१२ | |
| | एकूण क्षेत्र | | ०२-१७-०० (५ एकर १७ गुंठा) | | |

३.

| अनु. क्र. | गट/ उपगट | वर्ग | क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) | जमीन मिळकतीचे मालक |
|---|---|---|---|---|---|
| १. | १५/२/अ | १. | ०-७६-०० | ६.९७ | श्री.नरेश बळीराम देशमुख व इतर |
| २. | २७/४ | १. | ०-०४-०० | -- | |
| | एकूण क्षेत्र | | २ एकर | | |

कोणत्याही व्यक्तीस वरील नमूद केलेल्या कार्यालयाबाबत विक्री, विनिमय, तारण, भार, भेट, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टा उपभाडेपट्टा हक्क, परवाना, हायपोथिकेशन, मालकी हक्काचा हस्तांतरण, कोणत्याही ट्रस्टखालील लाभदायी हक्क, प्रिस्क्रिप्शन हक्क, प्रथम खरेदी हक्क, करार, डिक्री, आदेश, निर्णय किंवा इतर कोणत्याही प्रकारे दावा, आक्षेप, स्वारस्य किंवा वाद असल्यास त्यांनी त्यांचे दावे/आक्षेप/वाद याबाबतची कागदपत्रे सादर करून या सूचनेच्या प्रकाशनापासून चौदा (१४) दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्याशी संपर्क साधावा. अन्यथा आमचे क्लायंट वरील मालकाशी विक्री व्यवहार पूर्ण करतील आणि नंतर कोणताही तृतीय पक्षाचा दावा/आक्षेप/वाद विचारात घेतला जाणार नाही.

दिनांक ०५/०२/२०२६.

V.R. Legal & Co.

**श्री. विशाल सिंह**
(एडव्होकेट उच्च न्यायालय, मुंबई),
पत्ता-२२५, थापर कॉम्प्लेक्स, सेक्टर-१५,
सी.बी.डी.बेलापूर- ४००६१४
फोन नं. ९९२०३९०९५९,
ई मेल:adv.vrlegal@gmail.com


**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# मुंबई ते युएस क्रिकेट संघ शुभम रांजणेचा जिद्दी प्रवास!

**विनायक दळवी**

मुंबईत वाढलेल्या प्रत्येक क्रिकेटपटूचे एक स्वप्न असते, ते स्वप्न म्हणजे मुंबईसाठी खेळणं आणि त्यानंतर देशासाठी.शुभम रांजणेसाठी, हे स्वप्न लहानपणीच सुरू झाले. त्याने जवळपास १०-१२ वर्षे मुंबईत क्रिकेट खेळला. मैदानांवर घाम गाळला, विविध क्लब, वयोगट संघांचे आणि अखेरीस मुंबईच्या वरिष्ठ संघाचे प्रतिनिधित्व केले. या शहराने त्याला घडवले, कणखर बनवले आणि स्पर्धात्मक क्रिकेटचा खरा अर्थ काय असतो हे शिकवले.

क्रिकेट ही केवळ आवड नव्हती, तर तो एक वारसा होता. त्याचे आजोबा भारतासाठी कसोटी क्रिकेट खेळले होते. त्याच्या वडिलांनीही भारताचे प्रतिनिधित्व केले होते. शुभम तिसऱ्या पिढीचा होता, जो भारतीय क्रिकेटच्या परंपरेत रुजलेला कौटुंबिक वारसा शांतपणे पुढे नेत होता. २०२१ हे वर्ष त्याच्यासाठी एक महत्त्वपूर्ण ठरले असते.शुभम सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीसाठी मुंबईच्या संघात होता. त्या संघात अनेक स्टार खेळाडू होते, सूर्यकुमार यादव कर्णधार होता, सोबत श्रेयस अय्यर, शिवम दुबे, शार्दुल ठाकूर आणि इतर नावे होती, जे लवकरच भारतीय क्रिकेटवर वर्चस्व गाजवणार होते. तो एक उत्तम अनुभव होता. ड्रेसिंग रूम शेअर करणे, खेळाडूंसोबत वेळ घालवणे, एकमेकांकडून शिकणे, अशा प्रकारेच तुम्ही एक खेळाडू म्हणून घडता.

शुभम म्हणतो,पण संधी मिळाल्या नाहीत.एक खरा अष्टपैलू खेळाडू असूनही, शुभमला खेळण्याची संधी मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागला. मतभेदांच्या अफवा पसरल्या. सामने होत राहिले. पण संधी कधीच आली नाही. अधिक कळतो राखीव खेळाडूंच्या बेंचवरच बसलेला दिसायचा.मग तो निर्णय आला ज्याने त्याचे आयुष्यच बदलून टाकले. भारत सोडणे. मुंबई सोडणे. देशांतर्गत क्रिकेट सोडणे, आणि दुसऱ्या बाजूला कोणत्याही प्रकारची हमी नसताना, स्वप्नाचा पाठलाग करण्यासाठी साता समुद्रापलीकडे जाणे.तो एक कठीण निर्णय होता, शुभम कबूलकरतो.तुमचा देश, तुमचे प्रियजन, कुटुंब, मित्र यांना



सोडून जाणे, या सर्वांचा त्याग करणे.त्याला ती अनिश्चितता आजही स्पष्टपणे आठवते. तुम्ही तुमचे आयुष्य दोन सुटकेसमध्ये भरता, एका नवीन देशात जाता, आणि सर्वकाही नव्याने सुरू करता. पुढे काय होणार आहे हे तुम्हाला माहीत नसते. आणि म्हणूनच, शुभमने आरामाच्या मागे न लागता, संधीच्या शोधात अमेरिकेला जाणाऱ्या विमानाचे तिकीट काढले. एक नवी सुरुवात, एक नवी ओळख अमेरिकेत काहीही सहज मिळाले नाही. वेगळ्या परिस्थिती, वेगळी संस्कृती, असोसिएट क्रिकेट, कमी संसाधने, अधिक जबाबदारी, पण हळूहळू, या प्रवासाला अर्थ प्राप्त झाला. यूएसए संघ खेळाडूंच्या समूहापेक्षा वेगळा बनला. यु एस क्रिकेट संघात त्याने आपले स्थान निर्माण केले. मग विश्वचषकाचे सामने जाहीर झाले. यूएसए विरुद्ध भारत. ठिकाण: वानखेडे स्टेडियम. सामना: उद्घाटनाचा सामना. जेव्हा मी ते ऐकले, तेव्हा माझ्या अंगावर शहारे आले. हा काही साधा सामना नव्हता. हे माझे मूळ गाव होते. माझे वानखेडे स्टेडियम. त्याच्या आठवणी. भारताविरुद्ध, वानखेडेवर, विश्वचषकात खेळणे, ही आयुष्यात एकदाच मिळणारी संधी आहे.

## आरसीबीची जर्सी बदलली

**। बंगळूरू । वृत्तसंस्था ।**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू गेल्या वर्षभरापासून मैदानावर दमदार कामगिरी करताना दिसत आहे. गेल्या वर्षी, फ्रँचायझीने पहिल्यांदाच आयपीएलचे विजेतेपद जिंकले. महिला संघाला दुसऱ्यांदा चॅम्पियन बनण्याची संधी मिळाली आहे.

जेतेपद आपल्याकडे कायम राखण्याचा त्यांचा प्रयत्न असणार आहे. याचदरम्यान, फ्रँचायझीने नवीन हंगामासाठी नवीन जर्सी लाँच केली आहे, ज्यात एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे.आरसीबीची नवीन जर्सी लाँच२६ मार्चपासून सुरू होणाऱ्या आयपीएल २०२६साठी संघ पहिल्यांदाच गतविजेता संघ म्हणून स्पर्धेत उतरणार आहे. नवीन हंगामासाठी बेंगळुरूच्या संघातील बहुतांश खेळाडू कायम आहेत. पण ते सर्व खेळाडू एका नवीन लूकमध्ये दिसतील. हा नवीन लूक आरसीबीच्या नवीन जर्सीमध्ये दिसून येईल. आरसीबीने सोशल मीडिया व्हिडिओ पोस्टमध्ये त्यांच्या जर्सीचा लूक रिव्हिल केला आहे. आरसीबीचे खेळाडू यंदा त्यांची त्यांची नवी जर्सी परिधान करतील ज्यात छातीजवळ लोगोच्या वरच्या बाजूला एक सोनेरी स्टार मार्क करण्यात आला आहे. या नवीन जर्सीमध्ये आरसीबीच्या लोगोच्या वर असलेला एक स्टार म्हणजे त्यांच्या पहिल्या विजेतेपदाचे प्रतीक आहे.

**१ ऑक्टोबर २०२६ पासून लागू; टेस्टमध्ये शेवटच्या षटकात विकेट पडली तरीही खेळ सुरू राहील**

# क्रिकेटच्या नियमांमध्ये ७३ बदल

**। मेलबर्न। वृत्तसंस्था ।**

मेरिलबोन क्रिकेट क्लबने क्रिकेटच्या नियमांमध्ये ७३ मोठे बदल केले आहेत. यामध्ये कसोटी सामन्यात जर शेवटच्या षटकादरम्यान विकेट पडली, तर पूर्ण षटक खेळणे अनिवार्य करणे देखील समाविष्ट आहे. तसेच सीमारेषेवर घेतले जाणारे झेल, यष्टिरक्षकाची स्थिती इत्यादी अनेक नियमांमध्ये बदल समोर आले आहेत. हे सर्व नवीन नियम १ ऑक्टोबर २०२६ पासून लागू होतील. २०२२ नंतर नियमांमध्ये हे सर्वात मोठे अपडेट आहे.

एमसीसीने आपल्या वेबसाइटवर सांगितले की कसोटी सामन्यांमध्ये दिवसाचे शेवटचे षटक आता कोणत्याही परिस्थितीत पूर्ण केले जाईल. एमसीसीनुसार, असे न झाल्यास मखेळाचा रोमांच कमी होतो.एमसीसीने म्हटले आहे की, महे अनुचित मानले गेले की जर दिवसाच्या शेवटच्या षटकात गोलंदाजी करणाऱ्या संघाने विकेट घेतली, तर फलंदाजी करणाऱ्या संघाला नवीन फलंदाज पाठवण्याची गरज पडत नाही.



### लॅमिनेटेड बॅटला मंजुरी

**बॅटच्या वाढत्या किमती लक्षात घेता एमसीसीने ओपन एज क्रिकेटमध्ये 'लॅमिनेटेड बॅट' ला मंजुरी दिली आहे. तथापि, उच्च स्तरावरील क्रिकेटमध्ये अजूनही पारंपरिक बॅटच वापरले जातील.**

त्याचबरोबर निवेदनात असेही म्हटले आहे की, यामुळे वेळेची बचतही होत नाही, कारण उरलेल्या चेंडू दुसऱ्या दिवशी पूर्ण करावेच लागतात. यासोबतच यामुळे खेळाचा रोमांच कमी होतो. नवीन फलंदाज कठीण परिस्थितीतून वाचतो. कारण साधारणपणे त्यावेळी गोलंदाजांसाठी परिस्थिती अनुकूल असते. नवीन नियमानुसार, जर परिस्थिती अनुकूल राहिली, तर शेवटचे षटक पूर्ण केले जाईल, जरी त्यादरम्यान विकेट पडली तरी.

### बॉल आणि बॅटसाठी निश्चित केलेले निकष

**एमसीसीने सध्याच्या आणि माजी महिला खेळाडूंशी सल्लामसलत करून ज्युनियर आणि महिला क्रिकेटमध्ये वापरल्या जाणाऱ्या चेंडूंसाठी नवीन नियम बनवले आहेत. आता चेंडूंना तीन आकारात विभागले आहे.**

**आकार-१ हा तोच चेंडू आहे, जो आतापर्यंत पुरुष क्रिकेटमध्ये वापरला जात होता, यात कोणताही बदल केलेला नाही. फक्त आता तिन्ही आकारांसाठी नियम आणि निकष एकसारखे निश्चित केले आहेत, जेणेकरून कोणताही गोंधळ राहणार नाही.**

**आकार-१: हा तोच पारंपरिक चेंडू आहे, जो आतापर्यंत पुरुषांच्या वरिष्ठ क्रिकेटमध्ये वापरला जात होता. या चेंडूच्या वजनात आणि आकारात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.**

**आकार-२: हा चेंडू महिला क्रिकेट आणि मोठ्या वयाच्या कनिष्ठ खेळाडूंसाठी निश्चित करण्यात आला आहे. हा आकार-१ पेक्षा थोडा हलका आणि लहान असतो, जेणेकरून खेळाडूंना खेळायला सोपे जाईल.**

**आकार-३: हा चेंडू लहान वयाच्या कनिष्ठ खेळाडूंसाठी असतो. हा तिन्हीमध्ये सर्वात हलका आणि लहान चेंडू आहे, ज्यामुळे मुलांना चेंडू हाताळायला आणि खेळ शिकायला मदत मिळते.एमसीसीचे म्हणणे असे आहे की, प्रत्येक आकाराचा चेंडू त्याच्या निश्चित वजन आणि आकारानुसार बनवला जाईल, परंतु गुणवत्ता, टिकाऊपणा आणि सुरक्षिततेशी संबंधित नियम तिन्हीसाठी सारखेच असतील.**

एमसीसीने ओवरथ्रो आणि मिसफील्डरधील फरक स्पष्ट केला आहे. आता ओवरथ्रो तेव्हाच मानला जाईल, जेव्हा एखादा क्षेत्ररक्षक विकेटवर चेंडू फेकतो आणि तो चेंडू पुढे निघून जातो.

जर क्षेत्ररक्षक सीमारेषेजवळ चेंडू थांबवण्याचा प्रयत्न करतो आणि चेंडू हातातून निसटून पुढे जातो, तर त्याला ओवरथ्रो नव्हे, तर मिसफील्ड म्हटले जाईल.

आता डेड बॉलसाठी हे आवश्यक नाही की चेंडू गोलंदाज किंवा यष्टिरक्षकाच्या हातातच असावा. जर चेंडू कोणत्याही क्षेत्ररक्षकाकडे आला असेल किंवा मैदानावर थांबला असेल आणि पंचांना वाटले की आता फलंदाज धाव घेऊ शकत नाही, तर ते चेंडूला डेड बॉल घोषित करू शकतात.

नवीन नियमांनुसार आता पंचांना हे ठरवण्याची अधिक मुभा असेल की चेंडू पूर्णपणे थांबला आहे की नाही.हिट विकेटमधील गोंधळ दूर करण्यात आला आहे. आता हे समजून घेण्यात कोणतीही अडचण येणार नाही की फलंदाज कधी हिट विकेट बाद मानला जाईल आणि कधी नाही.जर फलंदाज शॉट खेळल्यानंतर डगमगतो आणि संतुलन साधताना स्वतः स्टंप्सवर पडतो, तर तो बाद होईल. त्यावेळी चेंडू किती दूर गेला आहे, याचा फरक पडणार नाही.जर फलंदाजाची एखाद्या क्षेत्ररक्षकाशी टक्कर होते आणि त्याच कारणामुळे तो स्टंप्सवर पडतो, तर त्याला हिट विकेट बाद दिले जाणार नाही.

जर फलंदाजाच्या हातातून बॅट सुटून थेट स्टंप्सला लागली, तर तो बाद मानला जाईल. पण जर बॅट आधी यष्टिरक्षक किंवा कोणत्याही क्षेत्ररक्षकाला लागून मग स्टंप्सला आदळली, तर फलंदाज नाबाद राहील.

## इंग्लंड अंतिम फेरीत

**सेमीफायनलमध्ये ऑस्ट्रेलियाचा २७ धावांनी पराभव**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अंडर १९ वनडे वर्ल्डकप स्पर्धेच्या उपांत्य फेरीत इंग्लंडने ऑस्ट्रेलियाचा २७ धावांनी धुव्वा उडवला. या सामन्यात नाणेफेकीचा कौल हा इंग्लंडच्या बाजूने लागला आणि प्रथम फलंदाजी स्वीकारली. हा निर्णय योग्यच ठरला.




इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकात ७ गडी गमवून २७७ धावा केल्या. तसेच विजयासाठी २७८ धावांचं आव्हान दिलं. ऑस्ट्रेलियाने या धावांचा पाठलाग करताना ४७.३ षटकात २५० धावा केल्या. तसेच विजयासाठी २७ धावा तोकड्या पडल्या.

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार ओलिवर पीकने शतकी खेळी केली. पण त्याची झुंझार खेळी व्यर्थ गेली. ओलिवर पीकने ८८ चेंडूत १० चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने १०० धावा केल्या. पण त्याला इतर खेळाडूंची हवी तशी साथ मिळाली नाही. त्यामुळे सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरी गाठण्याचं स्वप्न भंगलं.

इंग्लंडची सुरूवात काही चांगली झाली नव्हती. आघाडीचे तीन फलंदाज मोठी धावसंख्या करण्यात अपयशी ठरले. बेन डॉवकिन्स १ धाव करून बाद झाला. त्यानंतर जोसेफ मूर्सने २५ आणि बेन मायसने २४ धावा केल्या. संघ अडचणीत असताना कर्णधार आणि विकेटकीपर थॉमस रूने शतक ठोकलं. त्यामुळे इंग्लंडचा डाव काही अंशी सावरला. त्याने १०७ चेंडूत १४ चौकार आणि १ षटकार मारत ११० धावांची खेळी केली. तर कॅलेब फाल्कनरने ४० धावा केल्या. या व्यतिरिक्त एकही फलंदाज साजेशी कामगिरी करू शकला नाही. राल्फी अल्बर्टने १५, फरहान अहमदने २८, सॅबेस्टीन मॉर्गनने १५ आणि जेम्स मिंटोने २ धावा केल्या.

### 'भारतीय बुद्धिबळपटूंना आत्मपरीक्षणाची गरज!'

**मुंबई :** भारताचे आघाडीचे बुद्धिबळपटू जगज्जेता दोम्माराजू गुकेश, आर. प्रज्ञानंद आणि अर्जुन एरिगेसी यांना अलीकडच्या काळात सातत्याने यश मिळवता आलेले नाही. या अपयशामागे एक महत्त्वाचे कारण म्हणजे अतिप्रमाणात स्पर्धांमध्ये सहभाग, ज्याचा थेट परिणाम त्यांच्या मानसिकतेवर होताना दिसतो. ते ताजेतवाने राहत नाहीत. त्यामुळे त्यांनी आता आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे, असे मत ग्रँडमास्टर प्रवीण ठिपसे यांनी व्यक्त केले. भारतीय खेळाडू स्पर्धांच्या चक्रात अडकलेले दिसतात. आर्थिक प्रलोभने, उपस्थिती शुल्क आणि आयोजकांशी असलेले संबंध यामुळे स्पर्धांना नकार देणे त्यांना अवघड जाते, असेही ठिपसे म्हणाले.

## दिल्ली कॅपिटल्स सलग चौथ्यांदा अंतिम फेरीत

**गुजरात जायंट्सला ७ विकेटने लोळवलं**



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

वुमन्स प्रीमियर लीग स्पर्धेच्या एलिमिनेटर फेरीत दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात जायंट्स हे संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने गुजरात जायंट्सला ८ गडी राखून पराभूत केलं. तसेच चौथ्या या स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. अंतिम फेरीत दिल्ली कॅपिटल्सचा सामना आरसीबीशी होणार आहे.

एलिमिनेटर फेरीत दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकली आणि प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. गुजरात जायंट्सने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ७ गडी गमवून १६८ धावा केल्या आणि विजयासाठी १६९ धावांचं आव्हान दिलं. दिल्ली कॅपिटल्सने हे आव्हान ३ गडी गमवून १६ व्या षटकात पूर्ण केलं.

दिल्ली कॅपिटल्सकडून लिझेल ली आणि शफाली वर्मा यांनी आश्वासक सुरूवात केली. पहिल्या विकेटसाठी ७.१ षटकात ८९ धावांची भागीदारी केली. लिझेल ली २४ चेंडूत ४३ धावा करून बाद झाली. तिने ८ चौकार आमि १ षटकार मारला. त्यानंतर शफाली वर्मा २१ चेंडूत ३१ धावा करून बाद झाली. दोन विकेट पडल्यानंतर लॉरा वॉल्वार्ड आणि जेमिमा रॉड्रिग्स ही जोडी जमली. या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी ६८ धावांची भागीदारी केली. यासह विजयाची स्क्रिप्ट लिहिली गेली. दिल्ली कॅपिटल्सचा संघ विजयाच्या उंबरठ्यावर असताना जेमिमा रॉड्रिग्स २३ चेंडूत ४१ धावा करून बाद झाली. तिने ४ चौकार आणि १ षटकार मारला होता.

गुजरातकडून बेथ मूनी वगळता एकही फलंदाज साजेशी कमगिरी करून शकला नाही. तिने ५१ चेंडूत ६ चौकाराच्या मदतीने ६२ धावा केल्या. तसेच मधल्या फळीत जॉर्जिया वारेहमने ३५ धावांची खेळी केली. दिल्ली कॅपिटल्सकडून चिनेले हेन्रीने भेदक गोलंदाजी केली. तेने ३५ धावा दिल्या पण तीन विकेट काढल्या. तर नंदनी शर्माने २ विकेट आणि मिन्नू मनीने एक विकेट काढली.

गुजरात जायंट्सची कर्णधार एश गार्डनर म्हणाली की, आम्हाला वाटले की ते स्पष्टपणे बचाव करण्यायोग्य धावा आहेत. जेव्हा तुम्ही पॉवरप्लेमध्ये आधी दबाव आणत नाही. तेव्हा ते दुसऱ्या संघाला हे जाणून घेण्यास भाग पाडते की, दव पडल्यानंतर सोपं आहे. आज आम्ही आज रात्री स्टंप थोडे जास्त चुकवले. त्यांना लवकर खूप फ्री हिट्स दिले. आम्हाला त्यांची खेळण्याची पद्धत नक्कीच माहिती आहे. त्यांना गोलंदाजांवर हल्ला करायचा असतो आणि तुम्हाला दबावाखाली आणायचे असते.

### टी २० विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक डक!

**नवी दिल्ली :** पुरूष वरिष्ठ संघांचा टी २० विश्वचषक २०२६ सुरू होणार आहे. काही क्रिकेटपटू असे आहेत ज्यांना भोपळाही फोडता आला नाही. या विक्रमामध्ये सर्वात अव्वल स्थानावर पाकिस्तानचा माजी स्टार अष्टपैलू शाहीद आफ्रिदी आहे. तो ५ डावांमध्ये शून्यावर तंबूत परतला आहे. दुसऱ्या स्थानावर श्रीलंकेचा तिलकरत्ने दिलशान आहे. तो ५ वेळा शून्यावर बाद झाला. तिसऱ्या क्रमांकावर एक नाहीतर १० खेळाडू आहेत, जे प्रत्येकी चारदा शून्यावर वरच विकेट गमावून बसले. यामध्ये सनथ जयसूर्या, आंद्रे रसेल, सिमन्स, मोहम्मद नबी यांच्यासह आणखी सहा खेळाडूंचा समावेश आहे. या यादीत भारताच्या एका खेळाडूचाही समावेश आहे.

## संजू सॅमसनला मिळणार संधी?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टी २० वर्ल्ड कप स्पर्धेसाठी भारतीय संघ सज्ज आहे. भारतीय संघ सध्या दमदार फॉर्ममध्येही आहे. तसेच ही स्पर्धा घरच्या मैदानांवर होणार असल्याने भारतीय संघाकडून मोठ्या अपेक्षाही आहेत. भारताला पहिला सामना ७ फेब्रुवारी रोजी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर अमेरिका संघाविरुद्ध खेळायचा आहे. या सामन्यात भारताच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये कोणाला निवडले जावे, याबाबत बरीच चर्चा क्रिकेटविश्वात होत आहे.




अभिषेक शर्मासोबत संजू सॅमसनला संधी दिली जाईल, तर इशान किशन बॅकअप असेल, अशी चर्चा महिनाभरापूर्वी होती. मात्र नुकत्याच पार पडलेल्या न्यूझीलंडविरुद्धच्या टी२० मालिकेनंतर इशान किशनला सलामीला संधी दिली जावी अशी मागणी अधिक होताना दिसत आहे, याचे कारण म्हणजे या मालिकेतील संजू सॅमसनचे अपयश, तर इशान किशनने दाखवलेला अफलातून फॉर्म. संजू सॅमसनने ५ सामन्यांमध्ये केवळ एकदाच २० धावांचा टप्पा पार केला, तर इशान किशनने मात्र ४ सामन्यात एक शतक आणि एक अर्धशतक ठोकले आहे.

आता भारताचा फिरकीपटू युझवेंद्र चहलने नुकतीच अमेरिकेविरुद्धच्या सामन्यात भारताची प्लेइंग इलेव्हन कशी असावी, याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. त्याने या प्लेइंग इलेव्हनमधून इशान किशनला बाहेर ठेवले आहे. याशिवाय त्याने कुलदीप यादवलाही संधी दिलेली नाही. चायनामन गोलंदाज कुलदीपने न्यूझीलंडविरुद्धच्या तीन टी २० सामन्यात ४ विकेट्स घेतल्या होत्या. चहलने अभिषेक शर्मासोबत संजू सॅमसनवरच सलामीवीर म्हणून विश्वास ठेवला आहे. याशिवाय त्याने भारताच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये तिलक वर्मालाही संधी दिली आहे. त्याने मधल्या फळीत कर्णधार सूर्यकुमार यादवसह शिवम दुबे, हार्दिक पांड्या आणि रिंकु सिंद यांना निवडले आहे. चहलने फिरकी गोलंदाजीसाठी अष्टपैलू अक्षर आणि वरुण यांची निवड केली.

**कोट्यवधींचे होणार नुकसान | आयसीसीकडून पाकिस्तान क्रिकेट बोर्डावर कारवाई**

# पाकिस्तानला अरेरावीपणा पडणार महागात

**। मुंबई। वृत्तसंस्था ।**

पीसीबीच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ फेब्रुवारी रोजी भारताविरुद्धच्या सामन्यावर पाकिस्तानने बहिष्कार टाकल्यानंतर आयसीसीने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला अधिकृत टी २० विश्वचषक २०२६ प्रसारकांकडून कायदेशीर कारवाईची शक्यता असल्याचा इशारा दिला आहे.




पाकिस्तानने आपल्या सरकारच्या सूचनांचे पालन करून १५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे सामना न खेळण्याचा निर्णय घेतला, परंतु अद्याप आयसीसीत्याची कारणे अधिकृतपणे कळवली नाहीत. आयसीसी पाकिस्तानचा संपूर्ण वार्षिक महसूल हिस्सा, अंदाजे ३५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स म्हणजे जवळजवळ ३०० कोटी रोखू शकतात आणि त्या निधीतून प्रसारकांना भरपाई देऊ शकते अशी शक्यता आहे. पीसीबीच्या एका सूत्राने सांगितले की, जरी अध्यक्ष मोहसीन नक्वी यांनी गेल्या आठवड्यात पंतप्रधान शाहबाज शरीफ यांना या मुद्द्यावर माहिती देण्यापूर्वी बोर्डाच्या कायदेशीर तज्ज्ञांशी चर्चा केली.

पीसीबीच्या सूत्राने सांगितले की, जर पाकिस्तानने माघार घेतली नाही आणि भारताविरुद्ध खेळला नाही, तर त्यांना केवळ आर्थिक दंड आणि कदाचित प्रसारकांकडून खटला भरावा लागेल.पीसीबीच्या दुसऱ्या सूत्राने पीटीआयला सांगितले की, भारताविरुद्ध खेळू नये असे सरकारचे निर्देश असूनही पीसीबीला अडचणी येऊ शकतात, कारण ते त्यांचे सर्व सामने भारतात न खेळता त्यांच्या इच्छेनुसार तटस्थ ठिकाणी खेळत आहेत.

सूत्र पुढे म्हणाले, दुसरे म्हणजे, भारत सरकारने त्यांच्या संघाला पाकिस्तानमध्ये खेळण्याची परवानगी दिली नसली तरी, मे महिन्यातील संघर्षानंतरही आशिया कप किंवा आयसीसी स्पर्धांमध्ये तटस्थ ठिकाणी पाकिस्तानविरुद्ध खेळण्यापासून रोखले नाही. पीसीबीने अद्याप आयसीसीला त्यांच्या निर्णयाची लेखी माहिती दिलेली नाही. जेव्हा आयसीसीने सर्व आयसीसी स्पर्धांसाठी प्रसारकासोबत चार वर्षांचा करार केला, तेव्हा करारात पाकिस्तान आणि भारताशी संबंधित सामने समाविष्ट होते, ज्याच्या आधारे प्रसारकाने आयसीसीला पैसे दिले, असे सूत्राने सांगितले.

## विश्वचषकात चमकणार ३५ हून अधिक मूळ भारतीय खेळाडू

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

कॅनडा आणि युनायटेड स्टेटस्‌सह ३५ हून अधिक मूळ भारतीय असलेले क्रिकेटपटू ७ फेब्रुवारीपासून भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषकात घरच्या मैदानावर आपले कौशल्य दाखवणार आहेत.

मुंबईत जन्मलेला यूएसएचे वेगवान गोलंदाज सौरभ नेत्रवालकर याच्यासाठी वानखेडे स्टेडियमवर भाराताविरुद्ध खेळणे म्हणजे भावनिक पुनरागमन असेल. फागवाड्यात जन्मलेल्या इटलीच्या जसप्रीत सिंगसाठीही हा त्याच्या किशोरवयीन देशातील प्रथम दर्जाचा सामना आहे. नेदरलँडस्‌च्या ऑफ स्पिनर आर्यन दत्तला भारतीय मुळांची जडणघडण असतानाही तो भारतातील चाहत्यांच्या




आशीर्वादाने खेळण्याचा आनंद आहे..मूळ भारतीय असलेले खेळाडू कॅनडा संघात ११, यूएसए संघात ९, ओमान संघात ७, यूएई संघात ७ आहेत.

**महत्त्वाचे खेळाडू असे**

**सौरभ नेत्रवालकर :** भारतासाठी अंडर-१९ क्रिकेट खेळणारा आणि आता यूएसएचा वेगवान गोलंदाज. **मोणांक पटेल :** यूएसएचा कर्णधार, जो भारतातील गुजरात अंडर-१९ संघाचा माजी खेळाडू. **जसप्रीत सिंग :** फागवाऱ्याचा मुळाचा हा इटलीचा वेगवान गोलंदाज. **आर्यन दत्त :** नेदरलँडस्‌च्या संघातील एकमेव भारतीय मुळाचा खेळाडू, **दिलप्रीत बाजवा :** पंजाबातील गुर्दासपूरचा मुळाचा कॅनडा संघाचा कर्णधार, **जतिंदर सिंग :** ओमानचा कर्णधार, त्याला त्याच्या जन्मभूमीत खेळण्याचे स्वप्न पूर्ण होण्याची शक्यता कमी आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)